म. ग्रं. सं. ठाणें

विषय निबंध

लेखक रामचंद्र गंगाधर मोडे

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव हिंदूचा स्वदेशाभिमान व स्वधर्मनिष्ठा भाग-१ला

903 / ६२३

# हिंदूचा स्वदेशाभिमान व स्वधर्मनिष्ठा (भा. १ला)

निबंध

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निवडी
सं. नं. ५२३



# हिंदूंची

## स्वदेशाभिमान व स्वधर्मनिष्ठा.

( भाग पहिला. )

एक नवी टूम!

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्.॥
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ गीता ॥

रचणार

रामचंद्र गंगाधर भेंडे.

या पुस्तकाचे सर्व हक्क ग्रंथकर्त्यांनें आपलेकडे
ठेविले आहेत.

किंमत सहा आणे

'प.विं.नि.तरंग' प्रेस, मुंबई

त्यावर

☞ प्रथम ही **प्रस्तावना** वाचा.

अलीकडे हिंदु व मुसलमान यांच्यांत दंगे उपस्थित झाल्यामुळें हिंदुलोकांच्या मनांत स्वदेशाचा व स्वधर्माचा अभिमान वागूं लागल्याचीं शुभ चिन्हें दिसूं लागल्यावरून तदनुयायी प्रवृत्तीस पूर्णत्व यावें अशा हेतूनें संवादरूपी एक मोटा ग्रंथ रचून त्याचे बारा भाग केले आहेत. त्यांपैकीं हा पहिला भाग आहे. हा कृपा करून लक्षपूर्वक समग्र वाचावा. प्रथमच्या आठ दहा पृष्ठांत थोडेंसें वैलक्षण्य आहे त्याकडे तुर्त लक्ष देऊं नये; त्याचा संबंध पुढील भागांत येईल. प्रत्येक भाग बहुधा दरमहा निघेल.

आमच्या पुष्कळ लोकांत जें वैगुण्य आहे तें हळुहळू नाहींसें होऊन स्वदेश व स्वधर्म यांचा अभिमान दृढ व्हावा, या इच्छेनें त्याचें स्पष्टीकरण या पहिल्याच भागांत करवलें तितकें केलें आहे. त्याविषयीं मनांत संकल्पविकल्प न आणतां दर्शविलेल्या स्थितीचा सत्यासत्यपणा आपापल्या मनाशींच वाचकांनीं ताडून पहावा.

या पुस्तकाचे बाराही भाग ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं- ' **म्यानेजर मुंबईवैभव** ' कांदेवाडी मुंबई,- यांकडे अगर मालकांकडे आपलीं नांवें व पत्ता लिहून कळविण्याची तसदी घ्यावी. बाहेरगांवच्या गिऱ्हाइकांस टपाल हंशील निराळें पडेल.

**रामचंद्र गंगाधर भेंडे,**
खोताची वाडी, गिरगांव, मुंबई.

मुंबई, ता. २८।९।९०

# हिंदूंचा स्वदेशाभिमान व स्वधर्म.

चालू वर्षाच्या भाद्रपदमासीं शुक्लपक्षीं एके दिवशीं रविवारीं मुंबईशहरांत ब्याकबेवर समुद्राच्या किनाऱ्यानें हवा भक्षण करीत व्यायामासाठीं बांधलेल्या पायवाटेनें फिरत असतां एक बांक रिकामा दिसल्यामुळें त्यावर मी एका कोंपऱ्यास जाऊन बसलों. तो वर्षाऋतूचा दिवस असून त्या वेळेस सायंकालचा समय असल्यामुळें आसमंताद्भागीं अत्यंत रमणीय शोभा दिसत होती. आकाशाचा बराच भाग अभ्रांनीं आच्छादित झाला असून दिनपति क्षितिजाजवळ जाऊन पोंचले होते. एका बाजूनें वालुकेश्वराच्या टेंकडीचें टोंक व दुसऱ्या बाजूनें कुलाब्याचें टोंक अशीं समुद्रांत गेलीं असल्यामुळें त्या दोहोंमधील खाडीचा भाग बराच शोभायमान दिसत होता. समुद्र पुष्कळ खवळलेला असून लाटांचा खळखळाट मोठ्यानें ऐकूं येत होता. उजवीकडे, डावीकडे व मागच्या बाजूस पहावें तों जिकडे तिकडे हिरवें गार दिसत होतें. वारा मंद वहात असल्यामुळें मनास बरेंच समाधान वाटत होतें. मस्तकाला वारा लागावा या हेतूनें मीं आपल्या अंगावरील उपवस्त्र काढून बांकावर ठेविलें आणि त्यावर आपलें पागोटें

स्थापन केलें. पुढें तंबाखू खाण्याची तलफ वाटल्यामुळें खिशांतील बटवा बाहेर ओढून त्यांतली सुपारी अडकित्याच्या तोंडांत देतों न देतों इतक्यांत कोणी दोघे अनोळखी गृहस्थ त्याच बांकाजवळ येऊन पोंचले. त्यांना पाहतांच ते बांकावर बसण्यास आले अशा तर्कांत गर्क होऊन त्यांना जागेची चंगळ व्हावी या इच्छेनें फरकन् उपवस्त्रासहित पागोट्यास उचलून मीं आपल्या अंकासनारूढ केलें. हा माझा पराक्रम त्या दोघांस अभिनंदनीय वाटून त्या उपकाराची फेड त्यांनीं तात्काल केली. ती अशी कीं, त्यांपैकीं एकजण मजला हास्यमुद्रा दाखवून माझ्या सन्निधच बांकासनस्थ झाले आणि दुसऱ्यांनीं आपली दृष्टी मजवर फेंकून त्यांच्या उजव्या हातांत कांटी होती तीसह तो हात आपल्या कपाळाकडे एक दीड बोटाच्या अंतरा पावेतों नेऊन व इंग्रजी भाषेंतील 'थ्यांक्यू' हा शब्द मानेच्या ऐटदार झोंकांत व मंजूल ध्वनींत मुखावाटे हवेंत झुगारून लागलाच तो हात खालीं उतरला. हे दुसरे गृहस्थ बांकावर न बसतां डावें पाऊल बांकावर टेंकून, त्याच्या ढोंपरावर डाव्या हाताचा कोंपर रोंवून व साबणानें घांसून खरडून धुतलेल्या सांवळ्या रंगाच्या मुस्कटाच्या डाव्या गालफडास तळहाताचा टेंका देऊन उजव्या हातांतील कांटीनें उजव्या पायाच्या पोटरीवर फटके मारीत उभेच राहिले.

हे गृहस्थ बांकावर न बसतां उभे राहिले याविषयीं

संकल्पविकल्पांनीं माझ्या मनावर स्वारी केली; इतक्यांत बुद्धिदेवीनें येऊन सांगितलें कीं, हे इंग्रजी बोलणारे व इंग्रजी धाटीचा पोषाख घालणारे तेव्हां युरोपियन लोकांत दीर्घशंका व भोजन करतेसमयीं पाय सोडून उंच स्थानीं बसणें, लघुशंकेस उभें रहाणें व ईश्वरप्रार्थनेच्या वेळीं गुडघे टेकणें अशीं कांहीं आसनें आहेत त्यांपैकीं हवेचें भोजन चाललें असतां तंगड्यांचे श्रम परिहार करण्याचें आसन यांचें एक पायावर ऐटींत उभे रहाण्यासारखें असावें. हें ऐकून संकल्पविकल्प परत गेले.

या दोघां गृहस्थांचे पोषाख निरनिराळे होते. जे गृहस्थ माझ्या शेजारीं बसले होते त्यांनीं—मस्तकावर पांढरें पागोटें पुणेंशाई चालीवर बांधलेलें, कपाळास दुबोटी आडवें पांढरें गंध असून त्याच्या मध्यभागीं त्याच गंधाचे टिळे, अंगांत आंतल्या बाजूस छिटाची बाराबंदी व त्यावर पांढरा शुभ्र कळीदार व प्यालेदार आंगरखा चढविलेला असून त्याच्यावर उजव्या कांखेखालून डाव्या खांद्यावर टांकलेलें रेशिमकांठी नागपुरी उपरणें, कमरेस विलायती सुतीकांठी धोतर व पायांत पुणेंशाई चर्मी जोडा— अशा प्रकारचा वेष धारण केलेला होता. दुसरे गृहस्थ जे एका पायावर उभे होते— त्यांच्या पायांत पांच सहा रुपये किंमतीचा काळ्या रंगाचा विलायती बूट, वर विलायती तपकिरी रंगाच्या जीनची पाटलून, त्याच्या वरील बाजूस त्याच कापडाचा कोट नुसता अंगांत अडकविलेला ह्मणजे त्याचीं

बटनें बसविलेलीं नाहींत, कोटाच्या आंत त्याच कापडाचें ज्याकेट, त्या ज्याकेटाच्या गळ्याकडील उघड्या भागांत मानेभोंवतीं वेष्टिलेल्या पांढ्र्या शुभ्र कॉलरीचे शेव दावलेले व त्याच्या पॉकेटांतील वड्याळाच्या सांखळीच्या एका बाजूस अडकविलेल्या लॉकेटाजवळील आंकडा बटन घाल-ण्याच्या एका छिद्रांत बसविलेला, डोळ्यांस सोन्यानें मढ-विलेला चष्मा, कपाळ फटफटीत, मस्तकावरील केंशकलाप इंग्रेज लोकांसारखे वाढवून व नीटनेटके कापून डाव्याबाजूस भांग घेऊन साफ विंचरलेले व त्यांवर परशियन फेटा चढविलेला, त्या फेट्याच्या वरील भागास मध्यभागीं एक छिद्र असून त्यांत जाळीदार एक बटन बसविलेलें व हातांत विलायती कांठी—या प्रकारचें त्यांनीं सोंग घेतलें होतें. पोषाखावरून सकृद्दर्शनीं पागोटेंवाले हिंदु व फेटेवाले ख्रिश्चियन अथवा पार्शी असावेत, असें मला वाटलें.

पागोटेंवाले गृहस्थानें मला विचारलें कीं, 'आपण तंबाखु खात असतां काय?' मीं त्यांस 'होय' असें उत्तर देऊन तितक्या अवकाशांत अडकित्यानें फोडलेली सुपारी त्यांच्या हातावर दिली आणि पुन्हां फोडून फेटे-वाले गृहस्थास देण्यासाठीं हात पुढें केला इतक्यांत त्यानें नको असें मानेनें खुणावलें ह्मणून ती मीं आपल्याच श्रीमुखांत उडविली. पुढें आह्मीं दोघांनीं तंबाखू खाली. आह्मां दोघांची दृष्टी वालुकेश्वरच्या टेंकडीकडे होती आणि फेटेवाल्या गृहस्थाची दृष्टी कोटाकडे होती. एक दोन

मिनिटांत फेटेवाले गृहस्थ चमकल्यासारखे होऊन व बांकावरील पाय खालीं उतरून मागच्या बाजूस पायवाटेकडे झपाट्यानें गेले. माझी दृष्टी ते पोंचण्याच्या पूर्वीच त्या पायवाटेवर जाऊन दाखल झाली होती. तेथें आमच्या पाठीमागेंच आमच्या जवळचे गृहस्थ येतातसें पाहून एक दंपत्य आनंदमुद्रा करून उभें राहिलेलें दिसलें.

वाचकहो, हें दंपत्य ब्राह्मणज्ञातीचें होतें परंतु त्यांनीं निराळींच सोंगें धारण केलेलीं होतीं. पुल्लिंगी गृहस्थाच्या शिरकमलावर-हल्लीं शेणमातीचे सांचे करून व त्यांवर रंगविलेलीं चिरगुटें लपेटून तीं गोंदानें अथवा पिठाच्या खळीनें व सुईदोऱ्यानें बसवून थोपटून थापटून शिवून वाळवून करून पुणेंशाई चालीच्या बांधणीवर 'पगडी' या नांवानें ओळखण्यांत येणारीं मुंडासीं उर्फ टोप बनत असतात त्यांतील-काळ्या रंगाचें एक मुंडासें होतें, त्याच्या मागील बाजूस एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंत दीड दोन बोट रुंद घेरा दिसत होता, कपाळावर गंधाचे अनुष्टुप्, मिस्तुटाम कधींच कातर लावलेली नसल्यामुळें त्याचे केश बोट बोट लांब वाढलेले, त्याच्या अधोभागीं काळ्या बनातीचा विलायती चालीचा पोषाख ह्मणजे कोट, पाटलून, ज्याकेट व पायांत विलायती बूट— या प्रकारचा थाट होता. स्त्रीलिंगी गृहस्थाच्या पायांत पुणेंशाई जोडा, हातांत विलायती रेशमी कापडाची छत्री, ढुंगणास विलायती झानक, अंगांत पारव्या रंगाच्या मरीन्याचें पोलकें त्या

घोलक्याच्या डाव्या हाताच्या मनगटापावेतों लांब, त्यावरून पदर खांद्याखालून घेऊन पुढच्या बाजूनें कमरेस खोंचलेला, त्यावर पुन्हां शालजोडी ती अशी कीं,-त्यानें फक्त मागचा भाग झांकून पुढील भागीं त्याचे दोन्ही शेव दोन हातांवर सोडलेले,-दरएक हातांत तीन तीन बांगड्या त्यांत एक सोन्याची व दोन कांचेच्या, गळ्यांत दोनपदरी मोत्यांचा लड, मंगळसूत्र नाहीं, नांक बुचें, कपाळीं दोन्ही भिवयांच्या मध्यप्रदेशावर तुरीच्या डाळी एवढा कुंकवाचा टिपका व मस्तक उघडें-असा त्याचा वेष होता.

या दंपत्त्याजवळ आमच्या जवळील फेटेवाले गृहस्थ गेले. त्यांनीं जरा कंबर वांकवून प्रथम त्यांपैकीं स्त्रिलिंगी गृहस्थाशीं शेकह्यांड केला व त्यास क्षेमकुशल विचारून व लागलाच पुरुषवाचक गृहस्थाच्या हातांत हात देऊन त्याच्याशीं दोन मिनिटें पावेतों इंग्रजी भाषेंत ते बोलले. नंतर तें जोडपें चालतें झाल्यावर हे गृहस्थ पुन्हां आमच्याकडे येऊन बांकावर बसले. बांकाच्या एका कोंपऱ्यास मी, दुसऱ्या कोंपऱ्यास फेटेवाले व मध्यभागीं पांढऱ्या पागोटेंवाले या प्रकारें आह्मी तिघेजणांनीं तो बांक अडविला. पुढें थोड्याच वेळानें आह्मां तिघांचा संवाद चालला तो खालीं लिहिल्याप्रमाणें:—

**अलीबागकर** ( पांढरें पागोटेंवाले ) **मुंबईकरास** ( फेटेवाल्यास ) ह्मणतातः— हिंदु लोकांचीं मनें जीं पाश्चि-

मात्य जनांचें वैभव, कला, रीतरिवाज, पोषाख, खाणेंपिणें वगैरे पाहून त्यांतच विरगळून गेलीं होतीं तीं अलीकडे पुन्हां थिजायला लागून स्वदेशाच्या अभिमानाकडे वळा-वयाला लागलीं आहेत, असें हल्लींच्या त्यांच्या चळवळी-वरून, वर्तमानपत्रांवरून व कितीएकांच्या व्याख्यानांवरून अनुमान होतें.

**मुंबईकरः**–( पाठीमागें बोटानें दाखवून ) अहो, हें पहा, सभोंवतीं जमलेल्या मंडळीस एकजण व्याख्यान देत आहेत. तें व्याख्यान बहुतकरून आपण ह्मणतां तशाच धोरणावर असेल.

अ०–दिसतं तर खरं. मंडळीही बरीच जमली आहे, पण हे उंचस्थानीं उभे राहून बोलणारे टोपीवाले गृहस्थ तरी कोण आहेत आणि त्यांची ही एवढी बडबड कोणत्या विषयावर चालली आहे ?

**मुं०**– ‘ गोरक्षक मंडळी ’ नांवाची संस्था दहा पांच वर्षांपासून येथें स्थापन झालेली आहे आणि हल्लीं तीन चार महिने झाले ‘ आर्यधर्मरक्षकमंडळी ’ अशी एक संस्था निघाली आहे. या दोन्ही संस्थांच्या तर्फेचे कितीएकजण दर रविवारीं सायंकालीं येथें येऊन व्याख्यानें देत असतात आणि संस्थेच्या नांवाप्रमाणें त्यांच्या व्याख्यानांचा विषय असतो. आजकाल शि-वाजीच्या स्मारकाचा विषय उतूं जात आहे ह्मणून तो-ही विषय या लोकांनीं उचलला आहे.

मीः—मी तेथें मचाशीं थोडा वेळ उभा होतों तेव्हां शिवाजीच्या गुणानुवादाचें कथन चाललें होतें त्यांत व्याख्यानकारानें असें दर्शविलें कीं,— शिवाजी जर झाले नसते तर हिंदुधर्माचा समूळ ऱ्हास झाला असता, यासाठीं आपल्या धर्माचा अभिमान धरा, आपला आर्यधर्म महाश्रेष्ठ आहे, तो सोडून अन्यधर्म स्वीकारणें हें मूर्खत्व आहे.

अ०— ( मजकडे वळून ) 'आर्यधर्म, आर्यधर्म' हें अलीकडील लोकांचें पालुपद बनून राहिलें आहे, परंतु आर्यधर्म ह्मणजे काय, त्याचीं लक्षणें व उदाहरणें कोणतीं, त्याची स्थापना केव्हां व कोणत्या कारणास्तव झाली व कोणी केली ह्याविषयीं कोणी कांहीं सांगतात काय ?

मीः—हीं समुद्रावरील होणारीं व्याख्यानें मी आज बरेच दिवस ऐकतों, परंतु आपण विचारतां त्यांपैकीं कांहींच अद्यापि कोणाच्या मुखानें ऐकण्यांत आलें नाहीं आणि येथील जे व्याख्यानकार आजपर्यंत माझ्या दृष्टीस पडले ते ह्मणजे कोणी विद्वान्, अनुभवी, वेदांती, शास्त्री, धर्मनिष्ठ किंवा बहुश्रुत यांपैकीं आहेत असें मला वाटत नाहीं. वीसपासून तीस अथवा फार झालें तर चाळीस वर्षांच्या आंतील वयाचे बहुतेक असतात. आर्यधर्म, गोरक्षण व शिवाजी हे त्यांच्या व्याख्यानांचे विषय असून अमुक विषयावर बोलणार असें आरंभीं सांगून व्याख्यान चालू केलें ह्मणजे दुसऱ्या दोन विषयांचें ते त्यांत

मिश्रण करितात आणि त्या सर्व बोलण्याला ख्रिस्ती धर्मा- विषयीं कोणत्याही प्रकारची पूज्यबुद्धि श्रोत्यांच्या मनांत उत्पन्न होऊं नये या हेतूनें त्या धर्माची व तद्धर्मप्रतिपाद- कांची निंदा या चवथ्या विषयाची फोडणी देऊन आपलें व्याख्यान संपवितात. परंतु धर्म ह्मणजे काय, आर्य ह्मणून कांहीं देश आहे किंवा धर्म आहे, अथवा आर्य ह्मणजे अमुकच जातीचे लोक व बाकीचे सर्व अनार्य असें आहे कीं काय, धर्माचे आर्य व अनार्य असे कांहीं भेद आहेत काय, धर्म व कर्म हीं एक किंवा निराळीं— अशा प्रकारचे प्रश्न केले तर त्यांचीं सिद्धांतींचीं, अ- नुभविक व संतोषकारक उत्तरें या व्याख्यानकारांपैकीं कोणी देऊं शकणार नाहीं, इतकेंच नाहीं, तर, अलीकडचे मी मी ह्मणविणारे विद्वान्, आचार्य व शास्त्री यांपैकीं मुद्दां कोणीही देऊं शकतील, असें मला वाटत नाहीं.

मुं०—मी मी ह्मणविणारे विद्वान् ह्मणजे कोण हो ?

मी:—पाश्चिमात्य विद्या शिकलेले.

मुं०—तर मग तुह्मी कमाल केलीत. पोटभरू व मत्सरी शास्त्री व दांभिक आचार्य यांच्या पंक्तीस आह्मांला नेऊन बसविलेंतना ? आह्मीं चार पांच हजार रुपयांची राखरांगोळी केली, रक्ताचें पाणी केलें, दिवसाची रात्र केली, रात्रीचा दिवस केला, झोंप पुरी घेतली नाहीं, मातापितरांस दूर टाकिलें, लग्न झालें असून झालेंच नाहीं असें समजलों, स्वशरीराच्या आरोग्यतेकडे लक्ष

दिलें नाहीं, नेत्रांची दृष्टी कमी करून घेतली— असा त्रास वयाच्या पंचवीस तीस वर्षांपर्यंत सोसून व पुस्त-कांशीं उरस्फोड करून चार परीक्षा दिल्या आणि पदव्या मिळविल्या त्या तुमच्या कांहीं हिशेबांतच नाहींत काय? पूर्वी इतकी विद्या व इतके पोक्त विचार होते का? मोठमोठीं मुद्देसूद व्याख्यानें देणारे, पुस्तकें रचणारे, वर्तमानपत्रें चालविणारे, वेदांचे अर्थ करणारे, कायदे जाणणारे, चांगलीं चांगलीं वस्त्रें वापरणारे, मोठमोठा पगार मिळविणारे, सरकारांशीं टक्कर देणारे होते का पुर्वी? अशा सडका, छापखाने, औषधें, आगगाड्या, तारायंत्र, टेलिफोन, व्यापार, ट्राम्वे, इतर नानाप्रकारचीं यानें, उद्यानें, व्यायामासाठीं अनेक प्रकारच्या सोई, नाना-तऱ्हेच्या उपयोगी व मनास रंजविणाऱ्या वस्तू, नळाचे पाणी, उंच, हवाशीर व रमणीय घरें होतीं का? असा न्याय, उद्योग, शांतता व निर्भयपणा होता का? अहो, हे सर्व पाश्चिमात्य विद्येचे प्रभाव आहेत आणि तीच विद्या आह्मी संपादन करीत असतां तुह्मी त्याला कांहींच महत्व देत नाहीं याचें कारण काय असेल तें असो!!! धर्म ह्मणजे काय व कशाला ह्मणतात हें जाणणें असेल तर 'आर्यसमाजां'त जा. तो कांहीं आमच्या विद्येचा विषय नाहीं.

अ०—इंग्रज सरकारांनीं ठिकठिकाणीं विद्यालयें स्थापन केलीं, उंच उंच प्रतीचें शिक्षण देण्याचा क्रम

चालविला, अनेक प्रकारच्या कलांचें ज्ञान देऊं लागले, आपल्यास व आपल्या रयतेला सुख व्हावें या हेतूनें, तुमच्याच पैशानें कां होईना, नानाप्रकारचीं यानें निर्माण केलीं, उद्यानें रचिलीं, हवा खाण्यासाठीं व इकडून तिकडे जाण्यासाठीं रस्ते बांधले, विसाव्यासाठीं चित्रविचित्र बैठकी स्थापन केल्या, जागोजाग व मजलेमजलीं पाण्याचे नळ फिरविले, टेलिफोनच्या तारा व पेट्या दिल्या, तुमच्या सर्व देशभर तारायंत्र पसरलें, आगगाडी फिरविली, टपालखातें स्थापन करून अगदीं थोड्या किंमतींत लांब अंतरावरून लिहिलेला मजकूर तुह्मांस त्वरेनें पोंचवावयास लागले, शिवणकला शिकविली, शिवण्याचीं यंत्रें निर्माण करून तीं तुह्मांस पुरविलीं, औषधोपचार व शस्त्रक्रिया तुह्मांला शिकवून औषधें व शस्त्रें पुरवावयास लागले, संसारांत लागणाऱ्या बहुतेक जिनसा ह्मणजे सुईदोरा व काड्यांच्या पेट्यांपर्यंत लागतील तितक्या थोड्या किंमतींत आणून देऊं लागले, नानाप्रकारच्या चित्रविचित्र, उपयोगी, सुखदायक, चित्तास आल्हादकारक, पहातांच तोंडात बोट घालविणाऱ्या व घेण्याची इच्छा उत्पन्न करणाऱ्या ऐषआरामयुक्त अशा वस्तू आणून द्यावयास लागले, अनेक विषयांवर ग्रंथ रचून त्यांपासून तुह्मीं ज्ञान प्राप्त करून घ्यावें ह्मणून ते छापून त्यांच्या प्रती तुह्मांला पुरवावयास लागले आणि सर्व देशभर

एकसारखी शांतता ठेऊन व न्यायदेवता स्थापन करून तुमची बहुतेक प्रकारची भीति दूर केली—यांत तुमच्या एवढ्या उरस्फोड करून शिकलेल्या विद्येचे ते कोणते इजेड पडले? हे तर इंग्रज सरकारचे व तज्जाती व्यापाऱ्यांचे पराक्रम व तुमच्यावर उपकार समजाव-याचे. या देशाचा राज्यशकट इंग्रजांच्या हातीं येण्या-पूर्वीं या देशाची स्थिति कशी होती त्याची आठवण तर करा. फार प्राचीन कालचा विचार तूर्त करूं नका, कारण सात आठशें किंबहुना हजार वर्षांपूर्वींचा विश्व-सनीय इतिहास उपलब्ध नाहीं. यास्तव हजार आठशें वर्षांतच पहा कोठें शांतता होती का? हल्लीं जे मां-डलीक राजे आहेत त्यांच्या पूर्वजांत एकमेकांशीं वैरभाव, वर्षांतून एक दोनदां तरी एकाची दुसऱ्यावर स्वारी, जिकडे तिकडे लूट, दंगे असल्यामुळें लोकांचीं मनें अस्वस्थ व आपापलीं जीवितें सांभाळण्याकडे बहुते-कांचीं मनें व काल गुंतून गेलेले—अशी स्थिति होती कीं नाहीं हो? अकबर बादशहाच्या वेळेस व पेश-व्यांच्या कारकीर्दींत कांहीं काल पावेतों शांतता राहून लोक चिंतारहित झाले होते, असें इतिहासांत कोठें कोठें आढळतें. परंतु ती शांतता फार दिवस टिकत नव्हती. पांच चार वर्षें झालीं न झालीं इतक्यांत कोणी अमुक फौजेनिशीं अमक्या दिशेस चढाई करून आ-ल्याची बातमी येऊन धडकत असे. ही सर्व स्थिति

इंग्रजांनीं सर्व हिंदुस्थानदेश पादाक्रांत करून नाहींशी केली, एकमेकांतील दुही मोडून व आपलें वर्चस्व स्थापन करून चोहोंकडे सारखी शांतता पसरली, बंदोबस्त व न्याय या योगानें रयतेच्या मनांत स्वस्थता व निर्भयता उत्पन्न करून स्वतःविषयीं पूज्यबुद्धि भरवून दिली आणि नंतर व्यापारमिषानें ह्मणा किंवा कसेंही ह्मणा नानाप्रकारचे उद्योगधंदे स्थापन करून व ते तुह्मां-ला शिकवून शांततेचा पूर्ण उपभोग तुह्मांस घ्यावयाला लाविलें हा सर्व इंग्रजांसारख्या न्यायी, सूज्ञ, नीतिमान् तत्वज्ञ, धोरणी, उद्योगी, शोधक व कृतज्ञ राज्यकर्त्यांचा प्रताप. यांत तुमच्यासारख्यांनीं कोणते दिवे लावले तें सांगाल का ? तुमच्यासारख्या विद्वानांनीं कोणत्या तरवारी मारल्या सांगूं का ? ऐका नीट लक्ष देऊन, कलमवार सांगतों.—— प्रातःकाळीं सूर्योदयापूर्वीं उठणें ह्मणजे साखरझोंप मोडणें असें समजून प्रातःकाळीं उठण्याचें तुह्मीं सोडिलें; कदापि कोणी उठत असतील पण तें उठणें ह्मणजे पोटाच्या धाकासाठीं अथवा संगतीनें फिरण्यासाठीं, धर्म ह्मणून नाहीं; प्रातःस्मरण सोडिलें; वडिलांस नमन ह्मणजे हलकटपणा समजून त्याचा त्याग केला; प्रातःस्नान वर्ज केलें; संध्या, पूजा, ब्रह्मयज्ञ हीं व्यर्थ बडबड व कवाईत समजून त्या सर्वांस रजा दिली; उच्चार व स्वर कठीण, अर्थ समजत नाहीं आणि निरर्थक घोकंपट्टीनें मगजास त्रास होतो अशा समजुतीनें वेदाध्ययन बंद केलें; परमेश्वराचें नामस्मरण सो-

डिलें; हिंदुधर्म ह्मणजे अठरा धान्यांचें कोडबोळें, त्यांत अतिशयोक्तीच्या गोष्टी भरलेल्या, त्यामध्यें पराक्रमी पुरुषांस देवाचे अवतार ह्मटले आहेत, आकार आणतेवेळीं ज्याला शस्त्रांचे मनुष्यांनींच घाय मारिले, ज्याला इकडून तिकडे मनुष्यांनींच नेलें, आणि ज्याचें स्थापन मनुष्यांनींच केलें, ज्याच्या अंगीं चलनवलन नाहीं, ज्याला मनास वाटतील तसे अलंकार मनुष्यांनींच चढविले त्या दगडाच्या अथवा धातूच्या मूर्तीस देव मानून त्याला नमावयास त्यांत सांगितलें आहे असें समजून धर्म सोडला; देवळांत जाणें सोडलें; पुराण व कीर्तन ऐकणें सोडलें; व्रतें व सण हीं केवळ उपाशीं मरण्यासाठीं, गोड खाण्यासाठीं व मनरंजन करण्यासाठीं असून त्याशिवाय भटांस केळीं, नारळ, सुपाऱ्या व शिधे उपटावयाचीं साधनें करून ठेविलीं आहेत आणि त्यांत पाप पुण्य व फल यांचा बागुलबोवा लावून दिला आहे अशा समजुतीनें तुह्मीं व्रतें व उपोषणें सोडलीं; सोंवळ्या ओंवळ्याचें लचांड ढोंग समजून काढून टाकिलें; समुद्र, मोठमोठ्या नद्या व मोठमोठीं देवालयें यांस महत्व देऊन व त्यांना तीर्थें, ज्योतिर्लिंगें व स्वयंभू स्थानें अशीं दिव्य भव्य नांवें उपनांवें देऊन तेथें जाण्यानें; स्नान केल्यानें व दर्शनानें पापाचें क्षालन होतें असें भोळ्या भाविकांच्या मनांत बिंबण्याजोग्या कपोलकल्पित काहण्या केवळ मनलबार्थ रचल्या असें मानून त्यांवरील तुह्मीं आपली श्रद्धा उडविली; कपाळास गंध व भस्म न

लावावेंसें वाटलें; शेंडी काढून टाकली; यज्ञ नाहींसे केलेत; इतकेंच नाहीं तर रोजचा वैश्वदेवही बंद केला; अग्निहोत्राचा त्याग केला; बलिदान श्राद्ध, पक्ष इत्यादिकांस गुंडाळून ठेविलेंत; भजन व उत्साह यांना धाब्यावर बसविलेंत; पागोटें ह्मणजे मस्तकावर ओझें धारण करणें समजून ते टाकलें; अंगरखा काय गोंधळीबोवाचें सोंगच असें मानून त्याचा त्याग केला; उपवस्त्र नकोसें झालें; कंबरेला धोतर तें काय. तसेंच रेशिमकांठी असलें तरी जड. त्याचा निऱ्यांचा पुंजका डावी उजवीकडे लडबडता व पोटाला भार, त्यानें अंगाचें संरक्षण होत नाहीं, पोटऱ्या उघड्या रहातात. असें ह्मणून तें सोडलेंत; पावलें उघडीं राहून त्यांला भेगा पडतात, पायांचें संरक्षण बरोबर होत नाहीं व फटक फटक वाजतो ह्मणून जोड्याचा तुह्मी त्याग करूं लागलेत; आपलें कुटुंब ह्मणजे स्वतः आपण, आपली पत्नी व आपलीं अपत्त्यें इतकींच समजून आईबाप व बंधू यांस निराळे मानूं लागलेत; आपण मिळविलेल्या द्रव्यादिकांवर आपण. आपली पत्नी, आपलीं अपत्त्यें यांशिवाय प्रत्यक्ष आपल्या आईबापांचा हक्क नाहीं मग बंधुवर्गाचा कोठून असणार, असें समजूं लागलेत; ईश्वरभीति मनांतून झुगारून दिलीत; जनाची लाज एका कोंपऱ्यास ठेविलीत; आणि मनांत लाजेला शिरकावच करूं दिला नाहीं. तुह्मांस कोट, पाटलून, ज्याकेट, खमीस, कॉलर व बूट आवडायला लागले; खिशांत रुमालाची घडी ठेवावीशी

वाटली; इंग्रजलोकांसारखे मस्तकावर केंश वाढविणें पसंत पडलें; त्यांच्यासारखें ऐटींत उभें रहाणें, चालणें व अर्ध-वट उच्चारांत बोलणें आवडायला लागलें; त्यांच्यासारखे बायकांना बरोबर घेऊन फिरूं लागण्यांत खरें संसारसुख समजलांत; त्यांच्यासारखे टेबलावर जेवणें, त्यांचे खाण्याचे पदार्थ खाणें, खातिसमयीं कांटे चमचे वापरणें, बुट पाटलून घालून खाणें यांतच जन्माचें सार्थक, असें तुह्मी मानलेंत; दारू प्यायला शिकलात; संस्कृतभाषेचा तुह्मांस कंटाळा यायला लागून महाराष्ट्रभाषा हलकट दिसायला लागली; जगांत श्रेष्ठ भाषा कायती इंग्रजी भाषा व तत्वमहत्व कायतें त्या भाषेंत असें समजून सहज बोलणें तरी इंग्रजींत बोलायला लागलेत; मराठी बोलतांना तरी त्यांत एक दोन इंग्रजी शब्द घालावयाला लागलेत; मार्केट, फ्रूट, पेपर, इंक, पेन, पेन्सील, वेजीटेबल, कोट, ज्याकेट, खमीस, पाटलून, ट्रौझर, स्टाकिंग स्लीपर्स, स्लेट, क्याप, हेअरआईल, लाइट, ल्याम्प, टिकेट, वूल, फादर, मदर, वाइफ, सिस्टर, लेटर, कवर, लेसन, आइस, सिक, मेडिसीन, बॉटल, पौडर, रोजवाटर, ल्याव्हेन्डर, बटन, कालर, लॉकेट, वाच, एन्जिन, ब्रेक, गार्ड, स्टेशन, सिग्नल, स्टीमर, पोस्ट, प्याकेट, राजिस्टर, पार्सल, कोच, टेबल, इंजीनिर, बूक, लाइन, लेक्चर, थिएटर, पार्टे, पिआना, ब्यांड, फोटोग्राफ, टेलिफोन, टेलेग्राफ, ग्लास, कप, पाइन्ट, बिस्किट, ब्रेड, केक, इंच, बोल्ट, फूट, यार्ड, शिलिंग, गिनी, मनी, क्रिकेट, बिलियर्ड,

क्लब, हॉटेल, बटलर, कांट्र्याक्ट ( कंत्राट ), समन, वारंट, नोटीस, कोर्ट, डिक्री, वेस्टकोट ( वास्कूट ), व्याट, बॉल, कमिशन, एजन्ट, एडिटर, म्यानेजर, क्लार्क, टाईम, अवर, मिनिट, सेकन्ड, स्टूल, डाक्टर, ड्रेस, नोट, स्कूल, कालेज, चेन, ट्राम्वे, रेल्वे, रोड, मिल, रेजिमेन्ट, मास्तर, पोलीस, कान्स्टेबल, आर्टिकल, प्ल्यान, ब्रीफ, ज्युरी, असेसर, जड्ज, बॉन्ड, कॉपी, एस्टिमेट, कॉम्पांउन्ड, ट्याक्स, फी, क्यालेन्डर, डायरी, टाईमटेबल, शॉप, गोडा-ऊन, ऑफिस, क्लास, फर्स्ट, सेकन्ड, थर्ड, लिस्ट, बिल, चेक, इन्कायरी, कमिट, फाइन्डिंग, स्टाम्प, वालशेड, मूनग्यास, बाक्स, होल्डर, फ्लेझर, एक्झरसाइज, वेके-शन, हॉलिडे, वार्निश, व्हाइटवाश, कलर, सेलर, कम्पनी, नेटिव्ह इत्यादि इंग्रजी शब्द आपल्या भाषेंत मिसळून टाकलेत; घरांतील हिशेब, आपसांत एकमेकांस पत्रें लि-हिणें, सही करणें, शिक्का करणें यांत देखील इंग्रजी भाषा व लिपी वापरायला लागलेत; समाज वगैरे स्थापन करून जातिभेद काढून टाकण्याचा प्रयत्न तुह्मी चालविला; मत्स्यमांसाहार गोड लागायला लागला; तो घरीं मिळत नाहीं तेव्हां इराण्यांचीं दुकानें व हाटेलीं पालथ्या घाला-यला लागलेत; तेथें जाणें कांहीं अशीं कितिएक क्षौरी विद्वानांस बरें न वाटल्यामुळें त्यांनीं क्लबस् काढलीं आणि मांसादि आहार आपणांस वारंवार पुरविण्यासाठीं बटलराला ठेऊन त्यास कंत्राट द्यावयाला लागले; प्रवासांत रिफ्रेशमेन्ट

रूम्स मधून प्राप्त होणाऱ्या पदार्थांचा यथेच्छ आहार तुह्मीं चालविलात. इतके इंग्रजी शिकलांत आणखी परीक्षा दिल्यात आणि जे हल्लीं शिकतात त्यांचा मूळ हेतु इंग्रज सरकारची चाकरी मिळविण्याचा, याशिवाय दुसरा कांहीं नाहीं; ती एकदां बरी वाईट चाकरी मिळाली कीं कमाविलें. सरकारची चाकरी न मिळाली तर मग व्यापाऱ्याची अथवा संस्थानिकांची पत्करावयाची, एवंच चाकरीसाठीं एवढा सगळा उपद्व्याप; ती मोठी असो वा धाकटी असो, पण चाकरी ह्मटली ह्मणजे मजूरी व ताबेदारी यापेक्षां अधिक कांहीं नाहीं. त्यांत साहेबानें ड्याम, फूल, स्ट्यूपिड ह्मटलें तरी चालतें; महिन्याच्या महिना पगार दिला ह्मणजे झालें. हेंच कायते तुह्मी शिकून व परीक्षा देऊन दिवे लाविलेतना? आणखी सांगूं का? ऐका. तुह्मी वर्तमानपत्रें काढायला लागलेत; शृंगारिक नाटकें रचलींत; लांबलचक व मनरंजनीय कादंबऱ्या रचल्यात; प्रहसनें प्रसिद्ध केलींत; अनेक विषयांवर व्याख्यानें दिलींत, विलायत व अमेरिकापर्यंतचे प्रवास केलेत; कितीएक इंग्रजी पुस्तकांचीं स्वतः व शास्त्रांच्या मदतीनें वेदस्मृती, मीमांसादि ग्रंथांचीं भाषांतरें केलींत;-एवढें करून शेवट हिंदुधर्माला आपल्या वर्तनानें हरताळ लावलात, आपल्या शरीरास रोगग्रस्त करून घेतलेंत, सामाजिक सुधारणेचा मुद्दा चुकलेत, स्त्रियांस वाजवीपेक्षां ज्यास्त मोकळीक देऊन आपल्या वर्चस्वाला धक्का लावून घेतलात, दूरदर्शित्व तुमच्या

अंगीं अगदीं राहिलें नाहीं, परिणामाचा विचारच तुह्मांला सुचत नाहींसा झाला, तुमच्या ज्ञानाची सीमा पाहिली तर तुह्मांस जेथपावेतों दिसतें तेथपर्यंतच दृष्टीस पडली, तुह्मांला तुमच्या देशाचा विसरच पडला, स्मृतीकार व शास्त्रकार यांच्या उपदेशांचा पूर्णपणें विचार करण्याची शक्ति तुमच्यांत नाहींशी झाली आणि ह्मणूनच त्यांच्या मताविरुद्ध तुमचे उद्गार निघायला लागले, तुमच्या अंगचे सर्व पराक्रम नाहींसे होऊन सर्वस्वी तुह्मी पराधीन झाल्यांत- हे कायते तुमच्या विद्वतेचे जिकडे तिकडे उजेड पडले आहेत. खरें कीं खोटें नीट, विचार करून पहा.

मुं०—वाहवा, आज तर बोवा तुह्मी आमच्याशीं सामनाच करायला मांडलात. तुमचे हे शास्त्रीय विचार तुमच्या मनांतून जाण्यास किती युगें लागतील कोण जाणें? यावरून तुह्मांस बरें वाईटाचें ज्ञान कमी दिसतें; तुमच्यामध्यें अद्यापि सारासारविचार करण्याची शक्ति आली नाहींसें वाटतें; राज्यकर्त्या इंग्रज लोकांशीं तुमचें दळणवळण कमी किंबहुना नाहींच असें दिसतें; तुह्मांस वर्तमान कालाचें ज्ञान अगदीं नाहीं असें आढळतें; आणि जुनें तितकें खरें व नवीन सर्व खोटें असें तुह्मांला वाटतसें दिसतें. पण जुन्यांत व नव्यांत बरें कोणतें व वाईट कोणतें याचा विचार तुह्मीं आपल्या मनांत करीत नाहीं. तुमच्यासारखे कोंते मनाचे व दुराग्रही लोक अद्यापि पृथ्वीच्या पाठीवर जिवंत आहेत ह्मणून आमच्यासारख्यांचें पाऊल कितीएक चांगल्या

चांगल्या गोष्टींत मागें पडून राहिलें आहे. नाहींपेक्षां यापूर्वीं कधींच आह्मी उप-इंग्रज बनून गेलों असतों. यथा राजा तथा प्रजा, असें झाल्याशिवाय पूर्ण राजसुख मिळत नाहीं. तुमच्यासारख्यांमुळेंच धड इकडे ना तिकडे अशी स्थिति घेऊन आह्मी बसलों आहों. तुह्मी 'सुधारक' पत्र नेहेमीं वाचीत जा. खाणें, पिणें, लेणें, बोलणें, चालणें यांच्या नांवांनीं कां उगीच दगड फोडता? त्यांत कसला धर्म व अधर्म? अशा गोष्टी आतां सर्व विसरा. त्यांची चर्चा करण्याची वेळ आतां राहिलीच नाहीं. अशा गोष्टी तुह्मी भरसभेंत बोलून तर पहा. तुमचें व्याख्यान ऐकण्यास येणाऱ्यांपैकीं शाळेंतील व कॉलेजांतील टोपीवाली पलटण तुह्मीं असें कांहीं भारूड काढलेंत कीं लगेच टाळ्यांच्या गजरांत तुमची फटफजीती करून सोडतील आणि तुह्मांस पुढें चकार शब्द बोलूं देणार नाहींत, इतकेंच नाहीं तर, तेथून बाहेर निघालेत ह्मणजे रस्त्यांत तुमच्या मागें पुढें चालून तुमची हुर्यो करून सोडतील. ही तर मुलांची कृति झाली. आमच्यासारखे श्रोते त्या वेळेस फारसें न बोलतां तेथून घरीं गेल्यावर हातांत लेखणी घेऊन व तुमच्या बोलण्याविरुद्ध लांबलचक आर्टिकलें लिहून वर्तमानपत्रांत छापवितील आणि तुमच्याविषयीं लोकांचीं मनें कलुषित करून तुमचें ह्मणणें कोणी ऐकूं नये असें करून सोडतील. यासाठीं कालमानाकडे लक्ष देऊन अनाहुत विचार बाहेर पाडूं नका. काय काय होतें तें पहा.

न पाहवेल तर डोळे झांका. आमच्यांत मिसळणें असेल तर आमच्याप्रमाणें वागायला लागा पाहूं. नाहींपेक्षां इच्छेस वाटेल तें करा. पण तुमचे विचार तुमच्या मनांतच पुरून ठेवा. पचेल तें खावें, रुचेल तें बोलावें आणि आवडेल ते ल्यावें, पातक करूं नये, सदाचारानें वागावें हाच आपला धर्म. आपण सर्व एका ईश्वराचीं लेंकरें आहोंत. ईश्वरानें कांहीं जातीभेद घालून दिले नाहींत, त्यानें फक्त स्त्री व पुरुष या दोनच जाती उत्पन्न केल्या. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या कांहीं जाती नाहींत, यांला वर्ण हें नांव आहेच आणि त्यापेक्षां आचारभेद हें नांव अधिक शोभतें. या आचारभेदामुळें एकानें दुसऱ्यास शिवूं नये, मुलगी देऊं नये, एकानें दुसऱ्याच्या हातचें जेऊं नये, पाणी पिऊं नये असें कांहीं सिद्ध होत नाहीं. अहो. या जातिभेदानें तर सर्व या देशांत घोंटाळा होऊन राहिला आहे. पूर्वी असा घोंटाळा नव्हता. हल्लींचा घोंटाळा काढणें ह्मणजे मोठें जोखिमाचें, असाध्य व महत्वाचें कृत्य होऊन पडलें आहे. पाहिजे तशा रीतीनें खात्री करून दिली तथापि पालथ्या घड्यावर पाणी. काय तुमच्या सारख्यांच्या मनांत वेड भरून गेलें असेल तें असो. त्यामुळें आमचें बोलणें, चालणें इत्यादि सर्व त्यांस विपरीतच वाटतें. त्यांतलेच तुह्मी. अहो, या सव्यापसव्याच्या तुमच्या वेड्या समजुती आतां ठेवा एका अंधारकोठडीच्या कोंपऱ्यांत आणि शिरा वचूं आमच्या सुधारलेल्या पंथांत. अहो, इतकी विद्या शिकून

आह्मीं ज्ञान मिळविलें, त्या योगानें जोखिमाचीं व महत्वाचीं कामें उचलून व मोठमोठे पगार मिळवून द्रव्य संपादन केलें, जिकडेतिकडे मानसन्मान मिळवूं लागलों, सरकार आमचीं मतें मागायला लागले, लोकांस आमच्या अभिप्रायाची जरूर पडावयास लागली, रावसाहेब, रावबहादूर इत्यादि किताब मिळविले आणि कितिएक तर नामदार ह्मणवून घ्यावयास लागले हें कांहींच नाहीं का? उगीच का आमच्यापैकीं कित्येकांचीं स्मारकें झालीं आणखी होत आहेत? खोल विचार करा आणि मग कायतें बोला. नाहींपेक्षां मर्जीस येईल तसें बका. या देशाच्या कल्याणासाठीं हल्लीं किती चळवळ चालली आहे ती पहातांना? परद्वीपस्थ व्यापारी नानाप्रकारचा माल इकडे आणून त्याचे पैसे या देशांतून घेऊन जाऊं लागल्यामुळें या देशांतील द्रव्य नाहींसें होत चाललें असें मनांत आणून तो माल येथें तयार करावा ह्मणजे पैसा येथल्या येथें राहील यासाठीं युक्त्या रचीत आहों आणि अनेक प्रकारचे कारखाने स्थापन करीत व करवीत आहों, तसाच करांचा बोजा ज्यास्त वाढल्यामुळें रयतेची स्थिति कंगाल होत चालली आहे ह्मणून सार्वजनिक सभा व कांग्रेस मार्फत ओरड चालविली आहे आणि देशाचा अभिमान धरा, एकीनें वागा, आपसांत भांडूं नका असे वारंवार सभा भरून उपदेश करीत आहों— हें कांहीं तुमच्या हिशेबींच नाहीं का?

अ०—शाबास, झेंडा लाविलात हो झेंडा. शाबास तुमच्या

देशाभिमानाची, शाबास तुमच्या बोलण्याची व आचरणाची आणि शाबास तुमच्या व्याख्यानांची व विद्वत्तेची; असो, पण तुह्मी कोणत्या जातीचे ह्मणवितां ?

मुं०—हिंदू जातीचे.

अ०—त्या जातीच्या कोणत्या वर्णांत तुमचा जन्म झाला ?

मुं०—ब्राह्मणवर्णांत.

अ०—तुमचा पूर्वापार धर्म कोणता ?

मुं०—धर्म कोणता ह्मणजे, हिंदुधर्म.

अ०—हिंदुधर्माप्रमाणें तुह्मांला कांहीं संस्कार घडले आहेत का ?

मुं०—हो हो, माझी मुंज व लग्न त्याच धर्माप्रमाणें झालीं आहेत.

अ०—मुंज ह्मणजे काय हो ?

मुं०—मुंज ह्मणजे उपनयन अथवा व्रतबंध ह्मणतात तें.

अ०—उपनयन, व्रतबंध ह्मणजे काय पण तें तर सांगा ?

मुं०—पूर्वी मूल नागवें फिरतें तें पुढें न फिरावें ह्मणून त्यास लंगोटी नेसवितात, त्याच्या गळ्यांत जानवें घालतात व त्याच्याकडून भिक्षा मागवितात, त्याला संध्या शिकवितात-अशीं कांहीं लचांडें गळ्यांत घालणें त्याला मुंज ह्मणतात.

अ०—त्या मुलाकडून होम करवितात का ?

मुं०-हो, हो, करवितात.

अ०—त्याला कांहीं मंत्र शिकविण्यांत येतात का ?

मुं०—येतात तर आणि त्यांत मुख्य गायत्रीमंत्र शिकवितात.

अ०—गायत्रीमंत्राचा अर्थ तुह्मांला अवगत आहे काय?

मुं०—हो, हो, आहे; पण एवढे प्रश्न विचारण्यांत तुमचा हेतु कायतो थोडक्यांत कळूं द्या, ह्मणजे एकाच उत्तरांत सर्व खुलासा करितों.

अ०—बरं, बरं, पण मुंज ह्मणजे जें आपण आतां सांगितलें एवढेंच आपण समजतांना ?

मुं०—एवढेंच.

अ०—त्या समयीं मुलास त्याच्या बापाकडून कांहीं उपदेश होत असतात काय ?

मुं०—होत असतात.

अ०—ते कोणकोणते ते आपण सांगाल का ?

मुं०—माझी मुंज होऊन पुष्कळ वर्षें झालीं, बरें त्या वेळेस माझें वयही लहान होतें, त्यामुळें मला कांहीं बरोबर आठवत नाहीं; परंतु-खोटें बोलूं नये, शुचिर्भूत राहावें, रोज संध्या करावी, शौच्यास व लघुशंकेस जातेसमयीं जानवें कानावर ठेवावें आणि मौन धारण करावें-असे कांहीं उपदेश करितात, इतकें मला आठवतें. आतां तर मीं कांहीं वर्षांपासून संध्याच करण्याचें सोडलें त्यामुळें तीही म[ला]हल्लीं येत नाहीं.

अ०—तुह्मांकडून कांहीं अध्ययन करविलें होतें क्काय ?

मुं०—संध्या, पूजा, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव, रुद्र व थोडें पवमान मला शिकविलें होतें; पण तें मी विसरलों.

अ०—विसरावयाचें कारण काय हो ?

मुं०—कारण उघड आहे. नित्य त्याचें आवर्तन नाहीं ह्मणून.

अ०—नित्य अध्ययन करायला कांहीं अडचण येत होती का ?

मुं०—येत होती तर. इंग्रजी अभ्यास व इंग्रजी अभ्यास केलेल्यांची संगती या दोन कारणांमुळें अध्ययन करण्यास प्रथम वेळ मिळेना आणि पुढें हळुहळु त्याच्यावरची श्रद्धाच उडत चालली.

अ०—श्रद्धा उडण्याला मूळ कारणें जीं घडून आलीं असतील त्यांपैकीं थोडींशीं सांगाल का ?

मुं०—तुमच्या प्रश्नाचा हेतु अद्यापि कांहीं लक्षांत येत नाहीं आणि तुह्मी सांगतही नाहीं. काय असेल तो असो. माझ्या अनुभवाप्रमाणें मी आपलीं उत्तरें देतों. कारणें पाहिजेतना तुह्मांला ! ऐका सांगतों:—इंग्रजी अभ्यासास मजकडून प्रारंभ करविला त्या वेळेस मला बारावें वर्ष लागलें न लागलें इतका अजमास होता. सरकारी शाळेची फी ज्यास्त व शाळाही लांब ह्मणून माझ्या वडिलांनीं मला घातलें डॉक्टर विलसनच्या शाळेंत. ती बोलून चालून पाद्री शाळा. तेथें बायबलचा एक तास असावयाचा. एक वाजतां रजा झाली कीं, त्या शाळेंतील आमच्या ब्राह्मणांचीं मुलें

इतर मुलांबरोबर चालली शेजारच्या इराण्याच्या दुकानांत. तेथें चहा बिस्कुटें झोडतांना मीं त्यांना पाहिलें. मला मोठा चमत्कार वाटायला लागला. मी घरीं गेलों तेव्हां आईला विचारिलें कीं, ' आपण ब्राह्मणांनीं इराण्याच्या दुकानचा चहा बिस्कुटें व हलवायाकडचीं भर्जी व पुऱ्या खाव्या कायग ? ' ती ह्मणाली, ' खाऊं नये. ' नंतर मीं तिला सांगितलें कीं, ' अग, त्या समोरच्या चाळींतला लिमयांचा मुलगा तर इराण्याच्या दुकानांत जाऊन चहा पितो व बिस्कुटें खिशांत घालून आणून शाळेंत वसल्या वसल्या खातो. ' अशीं कितीएक मुलांचीं नांवें व कृती अनेक वेळा आईला मीं सांगितल्या; परंतु आईनें मला इतकेंच सांगावें कीं, ' त्यांना वाटावयाचें असेल, तूं त्यांच्या नादीं लागूं नको बरं '. मी त्या मुलांना ' बाटगे बाटगे ' ह्मणून चिडवायला लागलों. त्याचा त्यांनीं धरला मनांत डाव. कांहीं दिवस त्यांनीं तसेच जाऊं दिले आणि पुढें एके दिवशीं साडेचार वाजतां रजा झाल्यावर त्याच शाळेच्या कॉम्पौंडांत मांडला ब्याटबॉलचा डाव. मलाही खेळायला घेतलें. इतक्यांत आला एक हिंदु पावबिस्कुटवाला. त्याजपासून दोघां चौघांनीं बिस्कुटें घेतलीं. त्यांतलीं मलाही द्यावयास लागले. मीं घेण्याचें नाकारिलें. तेव्हां ते ह्मणाले कीं, हा विकणारा ब्राह्मण आहे. पहा याच्या गळ्यांतलें जानवें. याजकडचीं बिस्कुटें खाण्यास हरकत कोणती ? मला त्या वेळेस ज्ञान तें किती ? त्यांत तो खाण्याचा पदार्थ,

विकणाऱ्याच्या गळ्यांत जानवें पाहून मनांतील शंका गेली आणि दिलेलें बिस्कुट मीं खाल्लें. तें लागलें बरें, मुलें लागलीं हंसायला आणि ह्मणालीं कीं, ' तुला आज आह्मीं बाटविलें. आतां आह्मांला ' बाटगे बाटगे ' ह्मणशील का? ' मी ओशाळा झालों. पुढें त्याच मुलांनीं मला विचारलें कीं, ' हें खाल्लें ह्मणजे बाटतात असें तुला सांगितलें कोणी? ' मी ह्मणालों ' आईनें..' ते ह्मणाले ' आईला काय माहीत? त्या घरांत बसणाऱ्या बायका व आपण अमुक खाल्लें ह्मणून घरच्या मनुष्यांला सांगा तरी कशाला? ' असो; याचप्रमाणें माझ्या मनांत भरवून व पुढें मला इराण्याच्या दुकानीं एकदोनदां नेऊन त्यांनीं आपल्याच पैशानें चहा, पाव, बिस्कुटें, केक वगैरे खावयास घातले. मी तें कांहीं आईला सांगूं नये. पुढें एके दिवशीं सायंकाळीं कापाच्या मैदानावर तमाशा आला होता, तो पहावयास जाण्याचा मुलांनीं बेत केला. मलाही ' बरोबर चल ' असें ह्मणाले. मीं सांगितलें कीं, ' माझें येणें कठीण. कारण, मजला घरीं संध्या व धुपारती करावयाची आहे. ' त्यांनीं तें न ऐकतां मला आपल्याबरोबर ओढलेंच. रस्त्यानें मला सांगावयास लागले कीं, अजून संध्या तुझ्या गळ्यांतली गेली नाहीं का? इंग्रजी शिकणारानें संध्याबिंध्या कांहीं करूं नये हो. संध्या करायला लागलें कीं, इंग्रजी अभ्यास बुडाला ह्मणून समज. तुझ्या शेजारींपाजारीं कोणी इंग्रजी शिकलेले आहेत का? मी ह्मणालों. हो पुष्कळ आहेत. पण

त्यांना कधीं संध्यापूजा करितांना मीं पाहिलें नाहीं. ते ह्मणाले अरे संध्यापूजा करून बसलें ह्मणजे पुढें हातांत पळीपंचपात्री घेऊन बरोबर भिक्षा मागावी लागते हो. त्यांत आतां बाबा कांहीं राहिलें नाहीं. माझी त्या वेळेस पोरबुद्धीच. माझे वडील त्या वेळीं लोकांच्या घरच्या पूजा, अभिषेक व अनुष्ठानें यांमध्यें बहुतकरून नेहमीं गुंतलेले असत आणि रोज एक दोन शिधे, कांहीं पैसे व केळीनारळ आणीत असत. त्यांना इंग्रजी येत नव्हतें, कोठें लिहिण्याची वगैरे चाकरी नव्हती, भिक्षुकीवर उदरनिर्वाह चालत असे; आणि इंग्रजी शिकलेले गाडीघोड्यांतून फिरतांना दिसत, चांगले चांगले पोषाख करीत, त्यांच्या घरीं कितीएक लोक जोडे फाडीत, त्यांचें आर्जव करीत इत्यादि गोष्टींवरून त्या मुलांचें सर्व ह्मणणें मला खरें वाटलें आणि माझ्याही मनाची वृत्ति पालटायला लागली. सकाळीं उठल्यावर लेसनं पाठ करावयाचीं ह्मणून लवकर स्नान करूं नये. आमचे वडील सात वाजले कीं पळीपंचपात्री घेऊन बाहेर जात असत. नऊ वाजले कीं मीं स्नान करावें. आईच्या भीतीनें पाट्यावर उगाच थोडा वेळ बसून पळीपंचपात्री खडखडवावी आणि ताह्मन पाण्यानें भरून 'मला उशीर होईल लवकर जेवायला वाढ' अशी आईला घाई करून जेवून शाळेंत जावें. अशा कारणानें संध्या वगैरे सर्व बंद पडलें.

अ०—अशाच कांहीं कारणानें इतर तुमच्यासारख्या

सुधारकांचीं संध्या, पूजा वगैरे नित्य करावयाचीं कर्मे बंद पडलीं असावींत, नाहीं का ?

मुं०—हो, हो, अशाच कांहीं कारणानें. सुधारकांचींच कां ह्मणतां ? कुधारकांची देखील तीच दशा. मूर्तीस देव मानणाऱ्यांपैकीं दर्शन करण्यास देवळांत नियमानें व श्रद्धेनें जाणारे शेंकडा दहा सुद्धां मिळणार नाहींत. घरीं देवांची पूजा करणारांचीही अवस्था त्याप्रमाणें. घरोघरचे देवच आतां नाहींसे होत चालले. ज्यांच्या घरीं असतील त्यांनीं पूजा घातली एका भटाच्या गळ्यांत रुपया आठ आणे महिन्याचे देऊं करून अथवा भटाला चाकरीला ठेवण्याची ऐपत नसल्यास दिली घरांतील एखाद्या मुंज झालेल्या मुलाच्या गळ्यांत घालून. मुलगा काय, पूजा येवो न येवो, घालतो सर्व देवांची पलटण ताह्मनांत, ओततो त्यांच्या डोक्यांवर पाणी, पुसतो एका चिरगुटानें एकदम सगळ्यांस, बसवतो त्यांच्या ठिकाणीं, मग थापतो गंध, टाकतो तांदूळ, शिपडतो फुलें, लावतो उदबत्ती व फुलवात, दाखवतो नैवेद्य झाली पूजा. काय ती पूजा व काय ती भक्ति ! भटोबाचीही खुबी तीच. त्याच्यांत थोडीशी बडबड मात्र ज्यास्त. तुमच्याच तुकोबानें एका अभंगांत ह्मटलें आहे—' कथाऱ्यासी कैचा देव । पुजाऱ्यासी कैचा भाव '. त्यांच्या घरीं जाऊन पहावें तों देवाची खोली पृथक्, देव्हारा पन्नास पाउणशें रुपयांचा शिस्वी लांकडाचा वार्निश चढविलेला, त्यावर ठेवण्याचीं भांडीं

चांदीचीं अथवा पितळेचीं फार-स्वच्छ, पाट रंगीत, कापु-
राची रेलचेल. उदवत्त्यांची चंगळ, फुलेंतुळसी परडी
भरून, थाटमाट तर मोठा पण पुजेचा घाट मात्र म-
वाशीं सांगितला तसा खोटा. ही त्यांची मूर्तिपूजा. आतां
उपोषणाची मजा सांगूं का? ऐका. सर्व व्रतें व उपोषणें
करणारा तर आतां मिळणें नाहीं. बारमाहीं एकादशी
करणारा शेंकड्याचें तर नांव सोडा पण हजारांत एखादा
मिळाला तर मिळेल. त्यांतून फक्त आचमनाचें पाणी
पिऊन रहाणारा लक्षांत एक. बाकीचे काय विचारतां,
तुमच्या एका कवीनें ह्मटलें आहे कीं:—

**कवित.**

सेव खिष्मिष बादाम, सुरभीरमादाम, चारचुरुंजी जाम,
अनन्यासो धरे है। खोबरा सुवा रासार, सुंदर पके अनार,
तूंते बेर सेर चार, केले मेले परे है। पेढा बरफी बतासा,
काले अंगूर धरे खासा, भुइमुंगफलीदोने, मसालेदार किये
है। आटो दूध लापसी, फराल की तो बडी खुसी, पंडतकी
तो एकादसी, द्वादसीकी नानी है॥

हें काय उपोषण काहो? याचप्रमाणें जयंत्या, प्रदोष,
शिवरात्र, चतुर्थीचे उपास. वेद ह्मटलेले असे किती, त्यां-
तून त्यानें नित्य अध्ययन करणारे किती, ब्रह्मयज्ञ निय-
मानें करणारे किती व वैश्वदेव कितीजणांच्या घरीं रोज
होतो बरं? हें तर राहुंद्या; पण संध्या तरी कितीजण रोज
करितात, लघुशंकेच्या वेळीं पाणी कितीजण घेतात आणि

कांसोटा कितीजण सोडतात या सर्वांचा विचार तर करा. कुधारकांची कृति पाहिली तर अशी आणि रात्रंदिवस बडबड पाहिली तर सुधारकांच्या विरुद्ध. चमत्कार आहे कीं नाहीं ! नाहीं इकडचे ना तिकडचे. ते ही सोडावाटर पितात, आइसक्रीमवर हात मारतात, पाव बिस्कुटें झोडतात, दारूच्या बाटल्यांच्या बाटल्या पालथ्या घालतात, इराण्याच्या दुकानीं व लपून छपून हाटेलांत जातात, ओंवळ्यानें जेवतात, अभक्ष्य खातात. बूट पाटलून घालतात. कांहीं सोडीत नाहींत.

अ०—कुधारकांची कृति आपण वर्णन केली ती त्यांच्यामध्यें मूळपासून चालत आलेली आहे किंवा तो कित्ता त्यांनीं सुधारकांचा घेतला ?

मुं०—बहुतकरून सुधारकांचाच घेतला असें दिसतें.

अ०—सुधारकांची अशी स्थिति होण्याचा आरंभ केव्हांपासून झाला हो ?

मुं०—इंग्रजी अम्मल या देशावर बसल्यानंतर पाद्री शाळा स्थापन होऊन त्या शाळेंत ब्राह्मणांचीं मुलें जायला लागलीं तेव्हांपासून.

अ०—आपल्या विद्याभ्यासकालांत संस्कृतभाषेचा अभ्यास थोडाबहुत आपण केला होताना ?

मुं०—होय केला आहे. एकदोन काव्यें, एकदोन नाटकें, रामायणाचा कांहीं भाग व थोडेंसें व्याकरण शिकलों होतों.

अ०—आपण भारतभागवत पाहिलें काय ?

मुं०—नाहीं. पण त्यांतल्या बहुतेक गोष्टी कहाण्यांच्या रूपानें माझ्या ऐकण्यांत आल्या आहेत.

अ०—इतर कांहीं पुराणें वाचनांत आलीं आहेत काय?

मुं०—नाहींत.

अ०—आपण उपनिषदें, मीमांसा, स्मृती, सूत्रें कांहीं पाहिलीं आहेत काय ?

मुं०—मनुस्मृति पाहिली आहे. उपनिषदें वगैरे कांहीं पाहिलीं नाहीं.

अ०—आपण भगवद्गीता वाचली आहे काय ?

मुं०—होय, समग्र वाचली आहे.

अ०—त्यांतील सर्व श्लोकांचा अर्थ आपल्यास अवगत असेलच ?

मुं०—हो, अवगत आहे.

अ०—अर्वाचीन कवी ह्मणजे तुकाराम, रामदास, मोरोपंत, नामदेव, वामन, मुक्तेश्वर, कबीर, एकनाथ यांचे प्राकृत ग्रंथ आपल्या वाचण्यांत आले आहेत काय ?

मुं०—कांहीं वाचले व दुसरे वाचीत आहें.

अ०—हे प्राकृत ग्रंथ व गीता पहाण्याची आपल्यास कशी इच्छा झाली हो ?

मुं०—अहो खरें सांगू का ? आमच्या गीर्वाणभाषेचा अभ्यास कितीएक युरोपियन लोकांनीं केला आणि त्या भाषेंतील उपलब्ध ग्रंथ एकत्र करून सर्व छापले. नंतर त्यांत

काय आहे तें पहाण्याच्या इच्छेनें वाचायला लागले. जसजसे त्यांना ते अवगत होत चालले तसतसे आमचे वेद, भाष्यें, उपनिषदें. मीमांसा, सूत्रें, स्मृत्यादि उपलब्ध ग्रंथाचा संग्रह करून त्यांत काय आहे तें आपल्या देशबांधवास समजावें ह्मणून त्यांपैकीं बहुतेकांचीं त्यांनीं भाषांतरें केलीं. तीं भाषांतरें त्यांच्यांतील मोठमोठ्या लोकांच्या वाचण्यांत आलीं. पुढें त्यांनीं एकत्र जमून व त्यांत प्रतिपादित केलेल्या धर्मतत्वांविषयीं भवति न भवति चालवून शेवट सर्वांत हिंदुधर्म पुरातन व श्रेष्ठ आहे, त्यासारखा इतर धर्म नाहीं, हिंदुस्थानांत पूर्वीं महान् महान् विद्वान्, तत्वज्ञानी व सिद्धांती होऊन गेले, त्यांच्या विद्येचा, कलेचा, नीतीचा, सिद्धांतांचा व ईश्वरभक्तीचा आतां लेशही कोठें उरला नाहीं, शारीरिक बलाशिवाय दुसरें एक योगबल त्यांच्यांत होतें आणि त्या बलानें ते वाटेल तें करूं शकत होते—असे निश्चयात्मक उद्गार काढून तें उद्गार त्यांनीं प्रसिद्धही केले; ते आमच्या वाचण्यांत येऊं लागले आणि बाई आनी बिझान्टचीं गीतेवरील व्याख्यानें आमच्या कानीं पडायला लागलीं तेव्हां अम्हांला आमच्या धर्मांत कांहींतरी तत्व असावें असें वाटायला लागलें. मग लागलों आम्ही शोधायला गीता. स्मृत्या, भागवत, तुकारामाचे अभंग, एकनाथी भागवत. पहायला लागलों उपनिषदें, सोडायला लागलों सुधारक पंथ, धरायला लागलों तटस्थवृत्ति, धर्मनिंदा सोडली, हल्लीं

आमच्या बहुतेकांची तशी वृत्ति होत चालली आहे, पण अद्यापि मूर्तिपूजा कांहीं धरली नाहीं हो. जसेच्या तसेच राहून शोध व विचार करीत आहों आणि कोणी येऊन आमची खात्री करून देतो कीं काय त्याची वाट पहात आहों.

अ०--हं हं एवढ्या पंथाला येऊन पोंचला का?

मुं०--हो, पण काय हो चमत्कार! आमच्या धर्माच्या सर्वतोपरी विरुद्ध धर्मवाल्यांनीं आमच्या धर्माची स्तुती केल्यावर आमचा धर्म कोणता तें शोधावयाची ईर्षा आमच्या मनांत उत्पन्न व्हावीना? तेथपावेतों आमचा धर्म खोटा आणि त्यांत अठरा धान्यांचें कोडबोळें आहे असें आह्मी आमच्याच धर्माविषयीं पुरता विचार न करितां बकत सुटावें हा आमचा केवढा मूर्खपणा हो! आमच्यांतले पुढारी आतां खजिल पडायला लागले, डोळे उघडावे कीं झांकलेलेच ठेवावे याच्या विचारांत पडले, मूर्ति नसेल अशा ठिकाणीं व्याख्यानें देण्याचा प्रचार सोडीत चालले, देवळांत मूर्तीसमोर व सभामंडपांत व्यासपीठावर पुराणिकासारखे बसून एकनाथ, रामदास, तुकारामाचे ग्रंथ व गीता पुढें घेऊन व त्यांतील वाक्यें काढून त्यांवर व्याख्यानें देऊं लागले आणि शेवटीं अभंग व पदें ह्मणून ईश्वरस्तुति करूं लागले. कशी गम्मत आहे पहा! इतक्या पायरीला येऊन पोंचले तरी पीळ कोठें जातो हो? सुंभाचा पीळ तो जळाला तरी जायचा नाहीं. हा पीळ स्वाभाविक काहो?

छे, छे, तो उसना आणलेला ह्मणजे आधुनिक विद्येच्या जोरानें प्राप्त होऊन अंगीं भिनलेला. यामुळें कांहीं एखादें करायला गेलें तर त्याला आडकाठ्या पुष्कळ. हंसणारे व निंदा करणारे असंख्य. अशा स्थितींत काय करावें व काय न करावें तें सुचतच नाहीं. अर्धवटांचाच बाजर गच्च भरत चालला. जो तो समजतो शहाणा कायतो आपण. यामुळें आमचें आमच्या हातून सर्व जाऊन सर्वस्वी आह्मी आमच्याच देशांत व घरांत पराधीन झालों आहों. आह्मांला आमचे राजकर्ते शिकवितील तेवढी विद्या, शिकवितील ती कला, देतील तेवढी जागा, पुरवितील तेवढें पाणी, दाखवितील तो रस्ता, बोलतील ती पूर्वदिशा, करतील तो कायदा व देतील ती शिक्षा. इतक्या दशेला आह्मी येऊन पोंचलों आहों, तथापि आमचे डोळे कोठें उघडतात ? आह्मी जेवलों कीं सर्व जेवलेसे आह्मांला दिसतात, आणखी आमच्या जेवणापुरती पंचाईतही आह्मांला बरोबर करितां येत नाहीं. आमच्या आई, बाप, बंधू, बायका व पोरांचें संगोपन आमच्या हातून यथान्याय होत नाहीं. तर ज्या वर्गांत आह्मी मोडतों त्या वर्गाचें आणि ज्या गांवांत व देशांत रहातों त्या गांवाचें व देशाचें कल्याण आमच्या हातून कसें होणार ? संसारांत कसें रहावें याविषयीं आमच्या शास्त्रकारांनीं उपदेशांचे व उदाहरणांचे ढीग घालून ठेविले आहेत, पण ते पहातो कोण ? 'मनःपूतं समाचरेत्' याचा खरा अर्थ पाहूं जातां मनास पवित्र दिसेल तें करावें असा

असतां 'मनास वाटेल तें करावें' असा अर्थ आह्मी घेतो. एकाच चाळींत रहाणाऱ्या एका जातीच्या मंडळींतही पाहूं जातां आचारांत फरक, मतांत फरक व रूढींत फरक. बरें, कुटुंबांतील सर्वांचें तरी कोठें एकचित्त आहे? त्यांतही एकाचा जोडा दुसऱ्याच्या पायांत नाहीं, भावाबंदांत विरोध, मायलेकांत व बापलेकांत वितुष्ट, बायकांबायकांत वेबनाव, इतकेंच नाहीं तर संसारांतील कितीएक बाबतींत नवराबायकोमध्येंही मतभेद. एखाद्या क्षुल्लक वतनाच्या बाबतीसाठीं भावाबंदांच्या तीनतीन कोर्टांपर्यंत लढाया. बाबत पाहिली तर दहापंधरा अथवा फार झालें तर पंचवीसतीस रुपयाची आणि त्याबद्दल कोर्टाचा व वकीलाचा खर्च दरेक पक्षकारास दोन दोन तीन तीन हजार रुपये. केवढा आमच्या लोकांचा मूर्खपणा पहा!! अशा स्थितींत 'एकी करा, एकी करा' अशी ओरड चहूंकडे चालली आहेच. चमत्कार नव्हे का हा? कशी होणार एकी, कशी होणार सुधारणा व कसें होणार देशाचें कल्याण? आमचे व्याख्यानकार देशाच्या कल्याणाविषयीं बोलतांना सांगतात कीं, आपल्यांत एकोपा नाहीं याचें मुख्य कारण ज्ञातीभेद ह्मणून तो आधीं मोडा ह्मणजे एकी होण्याला उशीर लागणार नाहीं आणि एकी झाली ह्मणजे आपले अनेक फायदे होतील. एकी होण्यास जातीभेदाशिवाय दुसरी कोणतीच अडचण त्यांच्या लक्षांत येत नाहीं आणि ह्मणूनच त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें कांहीं घडून येत नाहीं.

माझ्या मताप्रमाणें पाहिलें तर प्रथम कुटुंबांत एकी करून त्याचीं उदाहरणें विद्वानांनीं घालून दाखवावीं; नंतर जातींत एकी करावी. अशा जातीचीं घरें एका गांवांत चार पांच कां असेनात, पण जर तीं सर्व प्रकारें एकमतानें व एक चित्तानें चालतात, तर त्यांचें अनुकरण त्या गांवांतील इतर जातीच्या लोकांनीं केलेंच ह्मणा. मग झालें सगळें गांव एक. नंतर त्या एकीचें फळ काय? सर्व प्रकारें श्रेष्ठत्व. त्या श्रेष्ठत्वाचा सुगंध सुटायला लागला कीं, आसपासचीं गांवें लागलीं त्याचा कित्ता वळवायला. चालला एकीचा प्रभाव वाढत गांवोगांवीं. एकी होण्याचा रस्ता तर मला हा दिसतो. ठिकठिकाणीं लांबलचक व्याख्यानें दिल्यानें, समाज स्थापन केल्यानें, मोठमोठ्या सभा भरल्यानें, क्लब काढल्यानें, सामाजिक परिषद् स्थापन केल्यानें जशी एकी असावी ह्मणून आपल्याला वाटतें तशा एकीच्या पायाचा एकही दगड ठेविला जाणार नाहीं. परंतु उलटें आपापसांतच द्वैत वाढणार असें मला तर खात्रीपूर्वक वाटतें. कारण, हेतु एकीचा खरा, परंतु तो सिद्धीस नेण्यास्तव जो प्रयत्न चालला आहे तो आडमार्गाचा आहे असें मी समजतों.

अ०–आडमार्ग तो कसा हो?

मुं०–इतकें सांगितलें त्यावरून नाहीं का कांहीं लक्षांत आलें! ऐका आतां विस्तारानें सांगतों. अहो, हे मिशनरी लोक आमच्या देशांत प्रथम आले तेव्हां वरवरचे आमचे आचारविचार पाहून आमच्या धर्मासंबंधीं कांहीं-

एक न पाहतां आह्मांला आपल्या धर्मांत ओढण्याच्या हेतूनें आमचीं मनें वळविण्यासाठीं आपल्या धर्माची थोरवी गाऊन आमच्या धर्माची निंदा करूं लागले. आमच्या देवास नांवें ठेवायला लागले. मंत्रतंत्र व पूजा हीं ढोंगें आहेत, असें ह्मणूं लागले. कपाळाला गंध लावण्यास, गोमुखींत हात घालून बसण्यास व गळ्यांत जानवें घालण्यास ते हंसायला लागले. ती वेळ कशी होती ह्मणाल, तर थोडक्यांत सांगतों:-- इंग्रजी अंमलाचा आरंभ होता. इंग्रज सरकार आपला अंमल बसविण्यासाठीं व आपलें महत्व स्थापन करण्याकरितां जरा कडकपणा वापरूं लागल्यामुळें आमचे लोक त्यांस अगदीं भिऊन गेले होते. गोरा लांबून दिसला कीं काढली पळ व लागले लपायला. त्यांच्या तोंडांत कामानिमित्त कोणी सांपडले कीं उडाली त्यांची त्रेधा आणि बसली पांचावर धारण. काम आटपलें कीं मजूरी मिळण्याची वाट न पाहतां व परवा न धरतां त्यांच्या हातून निसटून जाण्याचा यत्न ते करीत असत. जे कितीएक कर्मठ होते ते इंग्रज लोकांना भ्रष्ट समजून त्यांच्याशीं कोणत्याही प्रकारचें दळणवळण ठेवीत नव्हते, किंबहुना त्यांना स्पर्शही करीत नव्हते. स्पर्श झाला तर सचैल स्नान करीत असत. अशा स्थितींत ते व त्यांचे पाद्री जें सांगत तें निमुटपणें ऐकून घ्यावें लागत असे. तशांत आमच्या धर्माची आह्मांला पुरती माहिती नाहीं. अंधपरंपरेनें चालत आलेले आचार, कर्म व रूढी यांलाच आह्मी धर्म

समजत होतों. त्याची निंदा पाद्री लोकांनीं चालविली; ह्मणजे त्यांचें ह्मणणें मोडून पाडण्याचें ज्ञान आमच्यांत नव्हतें. ज्यांच्यामध्यें ज्ञान होतें ते पाद्रीं लोकांचें भाषण ऐकावयासच जात नसत. यदाकदाचित् पाद्री लोक असें ह्मणतात तर त्याचा खुलासा सांगा ह्मणून आमच्या-पैकीं कोणी विचारायला गेलें तर ते विचारणाराच्याच अंगावर येत. अशामुळें आमच्या लोकांच्या मनाचा झाला घोटाळा, त्यांत मिशनरी लोक पुढें यायला लागले लालुच आणि राजकर्त्यांनीं आगबोट, आगगाडी, तारायंत्रासारखे चमत्कार दाखल करण्याचें आरंभिलें. मग काय चमत्कारास नमस्कार. आमच्यांतील कर्मठ व विद्वानच लागले लटपटायला, मग इतरांची कथा काय? आमचीं होतीं तीं कर्में राहिलीं, मंत्र तर पोथींत दडाले आणि तंत्राला क्षयरोग लागत चालला. जो कांहीं सृष्टींत चमत्कार तो सर्व इंग्रजांच्या हातांत, इंग्रजांच्या विद्येंत, इंग्रजांच्या धर्मांत, इंग्रजांच्या वर्तनांत, इंग्रजांच्या कलेंत, इंग्रजांच्या पुरुषांत, इंग्रजांच्या बायकांत, इंग्रजांच्या मुलांत व इंग्रजांच्या देशांत; इतर ठिकाणीं काहीं नाहीं; आमच्या हिंदुस्थानांत विद्या नाहीं कला नाहीं, ज्ञान नाहीं, चमत्कार नाहीं यामुळें आपण केवळ पशूसारिखे आहोंत असें आह्मांस वाटावयाला लागलें. यामुळें पुढें लागलों सर्वस्वी त्यांचें अनुकरण करायला. त्यांची भाषा शिकायला लागलों, त्यांच्यासारखे पोषाख करायला लागलों, त्यांच्यासारखीं खाणीं खायला लागलों,

त्यांच्यासारखीं गाणीं गायला लागलों, त्यांच्यासारखे वाय-कांना बरोबर घेऊन फिरवायला लागलों, त्यांच्यांत वायकांचीं लग्नें मोठेपणीं होतात तशीं आमच्यांत व्हावीं व त्यांच्यांत विधवाविवाह होतात तसे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या ज्ञातींत व्हावे आणि त्यांच्यांत कोणाच्याही हातचें अन्न व पाणी चालतें तसा प्रचार आमच्यांत पडावा या हेतूनें हे तीन विषय आमच्यांतील विद्वानांनीं आमच्या सामाजिक उन्नतीसाठीं उचलले आणि त्यांवर शास्त्रमतें शोधिलीं; त्यांत कांहीं आधार मिळेना तेव्हां सद्यःस्थितीला अनुसरून लाभालाभ शोधले आणखी प्रचार चालू करण्यांत जितके लाभ दिसले आणि न चालू करण्यांत जितके तोटे दिसले तितके सभा जमवून, समाज काढून, वर्तमानपत्र, व्याख्यान व पुस्तकद्वारें लोकांपुढें ठेवायला लागलों. हा प्रयत्न आज सुमारें पंचवीस तीस वर्षांपासून चालू झाला. अद्याप त्याजपासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. ज्यांनीं विधवाविवाह केले ते आपल्या ज्ञातींतून निराळे झाले. ज्या मुली अठरा वीस वर्षांच्या वयापर्यंत लग्नाशिवाय राहिल्या त्यांच्याशीं लग्नें करण्यास कोणीच धजत नाहींसे झाल्यामुळें त्या संसारसुखाला अंतरल्या. दुसरें काय झालें तें पहा. हे कोण तर आर्थोडाक्स. हे कोण तर नास्तिक अशा प्रकारची दुही मात्र माजली. प्रथमपासून आमच्यांत शैव, वैष्णव, गाणपत्य, सौर, नानकपंथी, रामदासी, कबीरपंथी असे अनेक मार्ग किंवा पंथ चालत

आले आहेत, परंतु त्यांचें धर्मतत्व एक असल्या कारणानें सामाजिक तत्वास धक्का पोंचला नाहीं. हल्लींचे मार्ग जे निघाले आणि निघत आहेत त्यांत धर्मतत्व नाहीं, इतकेंच नाहीं तर, धर्माचा उलटा फजिता करून टाकल्यामुळें एकी होण्याचीं चिन्हें नाहींशीं होत चाललीं आहेत. नाहीं का यावरून हे आडमार्ग ? अहो, या पंचाइतींविणें यांचें कांहीं अडलें होतें का आणि सांगितल्या होत्या का कोणी करायला अथवा आलें होतें का कोणी विचारायला ? पंचाइती तरी किती विलक्षण ! ! ! यांच्या उपदेशास अनुसरून कोणी आपल्या विधवा कन्येच्या अथवा बहिणीच्या विवाहाची योजना करून दिवस मुकरर केला व कार्यास आरंभ केला आणि तन्म-तानुयायांस व इष्टमित्रांस आमंत्रणें केलीं कीं त्यांतून अर्धे तर कोणाची प्रकृति नीट नाहीं, कोणास ऑफिसांतून रजा मिळत नाहीं, कोणास इतर काम आहे अशा सबबीनें जायचे नाहींत. बाकीचे अर्धे जे जातील त्यांतून बहुतेक तुरे व पानसुपारी घेऊन यजमानास भेटलें न भेटलेंसें करून पळतील, त्यां-तून यजमानानें जेवणाचा आग्रह चालविला ह्मणजे कोणी पोट दुखतें, कोणी ताप आला, कोणी आतांच जेवून आलों अशीं निमित्तें सांगून जेवणाचें टाळतील. काय त्या कार्याची फजीती पहा. काय त्यांचीं व्याख्यानें लांबलचक व काय त्यांची कृति भित्रेपणाचीं, ती लक्षांत घ्या. मुलींचीं दहा बारा वर्षांच्या आंत लग्नें करूं नये असा भरसभेंत उपदेश करावा आणि स्वतःच्या मुलीचें नवव्या वर्षीच लग्न

करावें, याचा काय हो अर्थ? बोलणें अघळपघळ पण करण्याला टंगळमंगळ. नीतीधैर्याच्या नांवानें वषट्कार. हे बोलण्याप्रमाणें चालत नाहीं इतकेंच नाहीं तर त्या बोलण्यांत विरुद्धपक्षाचें खंडन करण्यास उदाहरणासहित अद्वा तद्वा भरसभेंत भाषणें करून आपल्या विद्येस व महत्वास कमीपणा लावून घेतात आणि जनांत उपहासास पात्र होतात, याचें कारण कांहीं समजत नाहीं. मी त्यांच्यांतलाच होतों, परंतु त्यांतील वैगुण्य माझ्या लक्षांत आलें तेव्हां तो पंथ मीं सोडून हल्लीं तटस्थ पंथ स्वीकारिला आहे.

अ०—एकूण आपण सुधारक नाहीं तर आतां?

सु०—मी सुधारक नाहीं व कुधारकही नाहीं. कुधारकांत पहावें तों त्याहून घोटाळे ज्यास्त.

अ०—ते कोणते हो?

सु०—मघाशीं तुह्माला पूजा, व्रतें, उपोषणें यांविषयीं सांगितलें तें. त्याशिवाय आणखी सांगूं का? अंगांत देव, पीर, भूत, पिशाच्च, मुंज्या, झोटिंग, देवी येतात ते. अंगारे, धुपारे, उतारे हें काय आहे? मुकटा, पितांबर, धाबळी नेसलें ह्मणजे सोवळें होतें; पाणी शिंपडलें, गोमुत्र, दर्भ व तुळशीपत्र टाकलें ह्मणजे पवित्र होतें; ब्राह्मणाच्या बायकांस शूद्र शिवला ह्मणजे विटाळ होतो; अंगावर कोरें लुगडें असलें ह्मणजे विटाळ होत नाहीं; अंगावरचें लुगडें सोडून नग्न होऊन दुसरें लुगडें नेसलें ह्मणजे

विटाळाचा बाध जातो; विसळणें, अंत्यजाला, विटाळशीला व मुनक्याला न शिवणें, भस्म लावणें, गंध लावणें. आपोषन, उत्तरापोषण, चित्राहुती, प्राणाहुती, आचमन. जानवें, रुद्राक्ष, दिग्बंध, भूशुद्धि, मार्जन, अंत्यष्टीप्रयोग, श्राद्ध, पक्ष, गोत्र, शाखा, सूत्र, जप, होम, काकबळी, वैश्वदेव, अग्निहोत्र, तर्पण, पिंडप्रदान, अग्नौकरण. चट, क्षण, ब्रह्मयज्ञ, श्रावणी, मंत्रजागर, सप्ताह, उत्साह, तुळशीपूजा व विवाह, हरितालिकापूजा, सत्यनारायणपूजा, तीर्थयात्रा, पितृगया, मातृगया, पारायण, प्रदक्षिणा. गृहमख, नवम, उत्थापन, गुरुमंत्र, सभर्तृका स्त्रियांस गुरुमंत्र, चौल, व्रतबंध व विवाहविधी, संन्यास इत्यादि अनेक लचांडें आहेत, त्यांचीं कारणें खात्रीपूर्वक समजत नाहींत तेथपावेतों मला ते सर्व घोंटाळे दिसतात.

अ०—समजे पावेतों घोंटाळे दिसतात ना? एवढें बरें आहे. पण समजून घेण्याची इच्छा आहे का?

मुं०—इच्छा तर खरी. पण मनाची खात्री होईल असा सांगणारा कोण आहे? कोणाला विचारलें ह्मणजे सांगतात कांहींतरी, पण तें ह्मणणें आमच्या मनाला पटतच नाहीं.

अ०—बरं बरं. इच्छा आहे तर तुमच्या मनाची खात्री करून देणाराही मिळेल. पण तुमच्या मनांत इच्छा तरी कशी उत्पन्न झाली हो?

मुं०—इच्छा उत्पन्न होण्यास बरींच कारणें झालीं आहेत, त्यांपैकीं थोडींशीं सांगतों. हल्लींच्या विद्येची

स्थिति तुह्मांस माहीत आहेच. एम्. ए. पर्यंत शिका, एम्. डी., एल्. एल्. बी. व्हा, एल्. सी. ई. व्हा किंवा बी. एस्. व्हा; पाहिजे ते बना, पण इतके शिकलां ह्मणून तुमच्यासाठीं राज्यकर्त्यांनें ताट वाढून ठेविलें आहे असें तर नाहींच. त्या संबंधांत परीक्षा दिलेले आणि न दिलेले सारखेच. बी. ए., एम्. ए. झालेले सरकारी ऑफिसांत लहान लहान पगाराच्या जागेवर कीं हो नोकरी करीत आहेत, इतकेंच नाहीं तर, सरकारी ऑफिसांत उमेदवारी करण्यासाठीं परवानगी मिळण्याबद्दल अर्जावर अर्ज करीत आहेत आणि वर्ष दोन वर्ष पावेतों उमेदवारीच करीत बसले आहेत! शिफारस असली तर लागायची दाद, नाहीं तर बसा रखडत! काय हो त्या विद्येची प्रौढी राहिली? बरं इतक्यावरच ही गोष्ट थांबून राहिली नाहीं. नीम व त्यापेक्षां ज्यास्त पगाराच्या जागा बनेल तितकें करून यूरेजीयन लोकांना देण्याचें मनांत आणून त्याप्रमाणें कांहीं सरकारी व व्यापारी अधिकारी आपला विचार अंमलांत आणायला लागले आहेत. आमच्या लोकांचा त्राताच कोणी राहिला नाहीं. पुढें कसकसे आमच्या लोकांवर प्रसंग येतील याचा विचार करीत बसलें तर विलक्षणच नर्क मनांत उत्पन्न होतात. पण चमत्कार पहा हो, पैसा खर्च होतो, आयुष्य खर्च होतें, शरीराची हानी होते, इतकेंही करून पुढें पैसा मिळेल याची खात्री नाहीं आणि विद्येचें महत्व कमी होत चाललें आहे, हीं तर आधुनिक विद्येचीं अनुभ-

विक फलें प्रत्यक्ष दृष्टीगोचर असून थोडेसे लोक गाडी-घोड्यांत फिरतात. मोठमोठे पगार मिळवितात, ऐषआरा-माचा उपभोग घेतात एवढ्या ओंझळभर भुलथापीवर जो उठला तो आपलीं मुलें दहा अकरा वर्षांचीं झालीं कीं घालतो इंग्रेजी शाळेंत. पैसा नसला तर कर्ज काढून अथवा भीक मागून भरतो महिन्या महिन्याची फी आणि घेतो बुकांवर बुकें. विद्या दिवसेंदिवस महाग होत चालली तरी त्याची परवाच धरीत नाहीं. सन १८६७-६८ सालीं सर्व मुंबईइलाख्यांतील मिळून म्याट्रिक्युलेशनच्या परी-क्षेस तीनशेंपासून चारशें मुलें होतीं. ती संख्या आतां चार हजारांपर्यंत वाढली. याच मानानें आणखी पंचवीस वर्षांनीं पहाल तर ती चाळीस पन्नास हजारपर्यंत होणार. इतक्या सर्वांस लिहिण्याची चाकरी कोठें व कोण देणार? चाक-रीची स्थिति तर तुह्मांस सांगितलीच. या भावी व लटक्या भुलथापीनें सुतार, सोनार, लव्हार, कांसार इत्यादिकांनीं आपापले पिढीजाद धंदे सोडिले आणि इंग्रजी शिकायला लागले. इंग्रजांस तर यामुळें अनेक लाभ झाले, परंतु आपल्या लोकांचें सर्वस्वी नुकसान होत चाललें ना? का-य ती विद्या व त्या विद्येचा उपयोग?

आतां धंद्यांविषयीं पहा. चाकरी नच मिळाली तर मग लागतात आमचे लोक दुसरा उद्योग शोधायला. ते तरी नवीन शोधून काढायचे काय? छे. इंग्रज जें करतात तेंच आह्मांला करायचें; पण त्यामुळें आमच्याकडे परतंत्रता किती येते

त्याविषयीं आह्मांला विचारच सुचत नाहीं. आह्मी गिरण्या काढल्या पण त्यांसंबंधीं लागणारें यांत्रिक सामान विलायतेहून आल्यावर, छापखाने काढिले त्यांचें तसेंच, दुकानें घातलीं तरी दुकानांत सामान विलायतेहून येईल तेव्हां आमचीं दुकानें चालायचीं व शोभायचीं. बरें, इतक्या परतंत्रतेनें धंदे चालविले तरी धंदे करणारे इतके वाढले कीं, कोणत्याही धंद्यांत आतां आमच्या लोकांना विशेष तर काय पण पोटापुरतें मिळेल याचीही पंचाईत पडत चालली आहे. मुख्य नफा विलायतवाल्यांचा, नंतरचा नफा आलेला सर्व माल जथाबंद खरीद करणाऱ्या आमच्यांतील श्रीमंत व्यापाऱ्यांचा, त्यानंतरचा नफा किरकोळ विक्रीच्या दुकानदारांचा. त्या दुकानदारांत आणखी चुर्माचुरशी. गिरण्या तरी आमच्या कोठें जशा चालाव्या तशा चालतात ? उत्तम प्रकारचें सूत कोठें या गिरण्यांत निघतें ? सूत नर विलायतेहूनच येतें. छापखान्यांचीही तीच दुर्दशा. जिकडे पहावें तिकडे असेंच. धंद्यांत कोणी कमाविताहेत, नाहीं असें नाहीं. पण ते किती हो ? फारच थोडे व ते सर्व धंदे परतंत्र.

आमच्यांतले लोक वर्तमानपत्रें काढायला लागले. काय त्या वर्तमानपत्रांची प्रतिष्ठा. किती प्रती त्यांच्या खपतात ? कोणाच्या चारशें, कोणाच्या आठशें, कोणाच्या हजार, कोणाच्या दोन हजार, कोणाच्या चार सहा हजार. झालें. यावरती कोणत्याही पत्राच्या प्रती खपत नाहींत. बरें नां-

वाजलेलीं पत्रें तरी किती. या इलाख्यांत मराठींत 'इंदु-प्रकाश,' 'नेटिव ओपिनियन' व 'केसुरी' आणि गुजराथींत 'गुजराथी' व 'गुजरातमित्र.' केसरी पत्राच्या काय त्या सहा हजार प्रती खपतात. हें पत्र प्रथमपासूनच उत्तम धाटीवर निघत आहे. यांत अनेक गहन विषयांवर विवेचनें येतात. भवति न भवति बरीच चालते. सरकारी अधिकाऱ्यांच्या हातून झालेल्या चुकांवर बरीच खरमरीत व आणिबाणीची टीका येत असते. दूरदर्शित्व बरेंच असतें. परंतु भाषा पुष्कळ कठीण व एखाद्या बाबतीवरील टीका अती कडक असते, असें साधारण लोकमत आहे. बरें गहन विषय विवेचनास घेऊन त्यांची इतिश्री तर होतच नाहीं. तोच प्रकार इंदुप्रकाशाचा व नेटिव ओपिनियनचा. अशा नांवाजलेल्या पत्रांची ही स्थिति, मग इतरांची काय कथा? पोटासाठीं कांहींतरी लोक करतात, त्यांतलाच हा एक व्यवसाय असें झालें आहे. सुचेल ते लिहितात आणि कांहीं बातम्या व जाहिराती मिळवून करतात पत्र पुरें. तीच व्यवस्था मासिक पुस्तकांची, कादंबऱ्यांची व नाटकांची. हल्लीं पुस्तकें बरींच निघायला लागलीं आणि तीं वाचण्याजोगीं आहेत. पण आमच्या लोकांत एक मोठी गोम आहे त्यामुळें सगळेंच आमचें बिघडलें आणि बिघडत आहे. आह्मांला वाचायची आवड तर खरी, पण घेण्याची आवड नाहीं; कारण, उत्तेजन देण्याचा गुण आमच्यांत कमी किंबहुना नाहींच ह्मटला तरी चालेल. फुकट वाचावयाला मिळेल तर बरें, असें ज्याला त्याला वाटतें.

राजकीय बाबतींत पाहूं गेलें तर आह्मांला न्याय निराळा व इंग्रजांला न्याय निराळा; आमच्या उद्योगाला बंधनें पुष्कळ व त्यांच्या उद्योगाला सवलती पुष्कळ; आह्मांला मजूरी पुष्कळ व पगार थोडा आणि त्यांना मजूरी थोडी व पगार पुष्कळ; त्यांच्यासाठीं वेटिंग व रिफ्रेशमेन्ट रूम्स् व आमच्यासाठीं छप्परही नाहीं; आतां करांच्या बाबतींत पाहिलें तर रयतेच्या कंठापर्यंत पाणी येऊन पोंचलें. कांहीं त्राण राहिलें नाहीं. त्यासाठीं प्रजा पुष्कळ ओरड करते व पायां पडते पण सरकार ऐकत नाहीं. जाहीरनाम्याप्रमाणें हक्क मागतात, पण सरकार देत नाहीं. इंग्रजांना हत्यारें वापरण्याला मोकळीक व आह्मांस बंदी. त्यांना आमच्या देशांत पाहिजे तिकडे जाण्यास मोकळीक व आह्मांस अटकाव. ते जिकडे जातील तिकडे राजे व आह्मी आमच्याच देशांत दीन अनाथासारखे.

उद्योग, धंदा व राजकीय बाबत याविषयीं तर हा प्रकार. आतां आमची आमच्यांतलीच स्थिति पहा. जरा कोठें इंग्रजींत ट फ करितां आलें अथवा एक दोन परीक्षा दिल्या कीं शिकले गगगाची बाराखडी, न शिकलेल्यांस समजायाला लागले मूर्ख, बरोबरीच्यांचा करायला लागले हेवा, द्यायला लागले व्याख्यानें आणि जायला लागले कोणत्या तरी एका समाजांत, प्यायला लागले दारू आणि खायला लागले पाव बिस्कुट व मांस मच्छर; चालायला लागले

बूट स्टाकिंग, कोट पाटलून व टोपी; करायला लागले साहेब लोकांशीं मैत्री; समजायला लागले त्यांना आपल्या घरीं बोलावण्यांत, त्यांना मेजवानी देण्यांत व भेटी पाठविण्यांत मोठेपणा आणि प्रयत्न करायला लागले त्यांच्यामध्यें हरएक प्रकारें मिसळण्यास. पण सर्व व्यर्थ. ते अद्यापि मिसळत नाहींत. ते दूरचे दूरच रहातात. ते कधीं आह्मांला आपल्या लग्नसमारंभांत बोलावीत नाहींत, नाहीं सणांत, नाहीं आपल्या बॉलमध्यें, नाहीं आपल्या बिलियर्ड रूममध्यें आणि नाहीं आपल्या खाण्यांत व पिण्यांत. इतके आमचे प्रयत्न निर्फळ जातात तरी आह्मी कोठें येतों शुद्धीवर ? ते आह्मांला लाथांवारी उडवितात तरी आह्मी आपले निगरगट्ट. त्यांचे रिवाजच आह्मांला आमच्या मुक्तीचीं साधनें दिसतात, त्यांचे खेळ आह्मांला खेळावेसे वाटतात आणि त्यांचीं वाद्यें आह्मांला आमच्या कार्यप्रसंगीं बोलवावींशीं वाटतात. एक ह्मणतो—आह्मी पन्नास रुपये रोज पडला तरी चिंता नाहीं पण किरिस्तांवचें ब्यांड मागवूं. एक ह्मणतो—उगीच व्यर्थ खर्च कशाला, बोलवा एखादा साधा ब्यांड झालं. दुसरा ह्मणतो—एवढा हुंडा देणार, खर्च करणार, मोठमोठ्या लोकांना बोलविणार आणि ब्यांडच्या खर्चांत काटकसर ? वडिलांचें नांव कांहीं ठेवायचें कीं आजच घालवायचें ? आह्मी तर तीन चारशें रुपये खर्च करून मिरवावयासाठीं एक किरस्तांवचें व घरीं लग्नाच्या वेळीं पलटणीचें ब्यांड बोलावणार. तुह्मी पाहिजे तर इतर

खर्चांत याची काटकसर काढा. ग्यास घ्या, इलेक्ट्रिक ला-ईट आणा! अहो, हा विद्वानांत घोंटाळा हो!!! कमा विद्येचा दुरुपयोग चालला आहे पहा. कसें यांच्या सारख्यांच्या व्याख्यानांला वजन येणार आणि अशांचे उपदेश कोण ऐकणार? आपला नाश व जगांत उपहास नव्हे का हा? समंजस व सूज्ञ साहेबलोकच तुमच्या या करण्याला वेडेपणा ह्मणतात. आह्मी ड्रेस करतों ह्मणून हे करतात, आह्मी दारू पितों ह्मणून हे पितात, आह्मी च्हा काफी पितों ह्मणून हे पितात, आह्मी बायकांना घेऊन फिरतों ह्मणून हे फिरतात, आह्मी व्याख्यानें देतों ह्मणून हे देतात. आह्मी केंस वाढवितों ह्मणून हे वाढवितात, आह्मी टोपी घालतों ह्मणून हे घालतात, आह्मी हवा खायला डोंगरावर जातों ह्मणून हे जातात; परंतु आमच्यासारखे विचार व नीतिधैर्य यांच्यांत अगदीं नाहीं. त्यांतून आमच्यांत जे रिवाज पडून गेले आहेत ते आमचा देश, हवा व धर्म यांस अनुसरून आहेत. यांचा धर्म निराळा, देश निराळा. व रिवाज निराळा. यांच्या देशाला अनुसरून यांचे पोषाख आहेत व धर्माला अनुसरून यांचीं कर्में आहेत आणि तीं कर्में सर्वस्वी ईशतत्वाला अनुलक्षून आहेत. आमच्यांत तशीं नाहींत. असें असून आमचे रिवाज, पोषाख व कर्में यांना आवडायला लागून हे आमच्या रूढी संसारांत घालू पहातात, पण ज्याचें त्यांसच शोभतें हें यांना समजत नाहीं याचें मुख्य कारण यांना यांच्या धर्माचें अगदीं ज्ञान नाहीं.

असें ठरतें. आह्मी जितकें यांच्या धर्माविषयीं जाणतों इतकें हे स्वतः जाणत नाहींत. उदाहरणार्थ, यांच्या जयंत्या, एकादशा, सण, संध्या, मंत्र, स्मृती इत्यादिकांची सकारणीक माहिती जी आह्मी देऊं शकूं तशी यांच्यांतील शेंकडा पांच काय पण एकही देऊं शकणार नाहीं. या प्रकारचे साहेब लोक उद्गार काढून आह्मांस हांसतात, त्याची आह्मांला कांहींच लाज वाटूं नये काय? अहो, आमचे शहाणे पूर्वज असून त्यांचे वंशज आह्मी मूर्ख झालों आणि आमच्या राजकर्त्यांचे पूर्वज अगदीं रानटी असून त्यांचे वंशज शहाणे झाले. हें झालें तरी कसें, याचा कोणी विचार करतील काय? जोंपावेतों पैशाचा व स्वतंत्रतेचा दुरुपयोग, विद्येचा गर्व, मताभिमानाची घमेंडी, आपपराचें अज्ञान, मत्सर, दंभ, आळस आणि ऐषआराम आमच्या मनावर राज्य करीत आहेत आणि मागें आमची दृष्टी वळत नाहीं तोंपावेतों आमच्या इच्छा कितीही सयुक्तिक असल्या तरी त्यांपैकीं एकही तृप्त होणार नाहीं. असें बोलायला गेलें ह्मणजे कितीएक ह्मणतात कीं,-अशाच उद्योगानें कांहींतरी होईल, उगेंच बसून राहिल्यानें कांहीं न होतां कोणे दिवशीं घरच जाईल.-काय चमत्कार हो!!! घर जाण्याचें बाकी आहे असें यांना अजून वाटत आहे, तेव्हां नवलच नाहीं का? राज्यकर्त्यांनीं तुमच्या देशाचा अग्नी, पाणी व पृथ्वी हीं तीन तत्वें तर आपल्या ताब्यांत ठेविलीं, आतां काय आकाश व

वायू हीं दोनच तत्वें राहिलीं ना ? आमच्या डोळ्यांवरचा धूर जाईल तो सुदीनच ह्मणायाचा.

दुसरी एक गम्मत सांगतों हो, ऐका. कित्येक सुधारकांनीं काढले समाज. कोणी प्रार्थनासमाज स्थापन केला, कोणी आर्यसमाज काढला, कोणी ब्राह्मसमाज काढला. या सर्वांचा कटाक्ष काय तर मूर्तिपूजा बंद करावी, सोंवळ्याओंवळ्याचें ढोंग काढावें व जातिभेद काढून टाकावे. पण पंथ मात्र निराळे ते असे कीं:—वेद ईश्वरप्रणित नाहींत; त्यांत व स्मृतींत निरूपित केलेला धर्म त्या कालाला अनुसरून होता; हल्लींच्या कालास तो अनुसरून नाहीं; कालाप्रमाणें धर्ममार्गांत बदल झाला पाहिजे; राम, कृष्ण हे कांहीं देव नव्हत, ते पराक्रमी पुरुष होते; त्यांना देव मानून व त्यांच्या मूर्ती करून पूजणें हें मौर्ख्य आहे, कारण देव निराकार आहे ह्मणून त्याला आकार नाहीं; जातीभेदाचें लचांड जें हल्लीं दिसतें तें कोणी मतलबी, महत्वाकांक्षी व अदूरदर्शी लोकांनीं घातलें आहे; ईश्वरानें फक्त स्त्री व पुरुष या दोनच जाती केल्या; सर्व प्राणी ईश्वराचीं लेंकरें आहेत व त्यांत भेद मुळींच नसला पाहिजे; हीं प्रार्थनासमाजाचीं तत्वें. आर्य समाजाचीं तरी बहुतेक तत्वें हींच, परंतु थोडा फरक आहे. तो फरक इतकाच कीं, वेदधर्म खरा आहे व तोच अनुसरला पाहिजे; त्यांत कांहीं मूर्तीपूजा नाहीं; होमहवन आहे तें दरएकानें केलें पाहिजे; त्यांत अहिंसेचा मार्ग सांगितला आहे तो

सर्वांनीं धरला पाहिजे ( खाण्यासाठीं प्राणी मारणें एवढाच अर्थ ' हिंसा ' या शब्दाचा हे आर्यसमाजवाले समजतात. यापेक्षां ज्यास्त कांहीं जाणत नाहींत. ). प्रार्थनासमाजवाले अहिंसेविषयीं तर चकार शब्द बोलत नाहींत. आर्यसमाजवाल्यांनीं आणखी एक ' न भूतो न भविष्यति ' असें खूळ काढलें आहे. तें कोणतें ह्मणाल तर एखादा ब्राह्मण अथवा ब्राह्मणेतर हिंदु ख्रिस्ती अगर यवनी वगैरे परधर्मांत शिरल्यानंतर परत हिंदुधर्मांत येण्याची इच्छा दर्शवील तर त्यास हे समाजवाले हिंदुधर्मांत घेतात. ब्राह्मसमाजाविषयीं मला पुरती माहिती नाहीं; तथापि ते कोणत्याही धर्माला मानीत नाहींत आणि वेदालाही मानीत नाहींत. प्रार्थना व आर्यसमाजांतल्या सभासदांपैकीं ज्यांच्या गळ्यांत प्रथमपासून जानवें आहे त्यांनीं नांवाला तरी अद्यापि तें ठेविलें आहे. ब्राह्मसमाजवाल्यांनीं तर तेंही काढून फेंकून दिलें. आर्यसमाजांत संस्कृतभाषा जाणणारे विद्वान् शास्त्री बरेच शिरले आहेत. आमचीं पुराणें सर्व खोटीं असें सिद्ध करून देण्याचा त्यांनीं विडा उचलून व त्यांतील एक दुसऱ्यास विरुद्ध अशीं वाक्यें काढून त्यांचे अर्थ व टीका करून पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचें मांडलें आहे. प्रार्थनासमाजवाल्यांकडे पुन्हां पाहिलें तर ते अलिकडे ' **उत्तमा सहजावस्था मध्यमा ध्यानधारणा । कनिष्ठा मूर्तिपूजा च तीर्थयात्रा धमाधमा ॥** ' या वाक्याला अनुलक्षून कनिष्ठ कां होईना पण मूर्तिपूजा

हा ईशप्राप्तीचा एक मार्ग आहे असे भीतभीत उद्गार काढायला लागले आहेत. त्यांच्यापैकीं कितिएकांच्या घरीं अद्यापि मूर्तिपूजा आहे. कित्येक जयंत्यादि उत्साह करितात आणि कुलधर्म कुलाचारही चालवितात. हा सर्व प्रकार चालला आहे, परंतु करणें थोडें व बोलणें पुष्कळ दृष्टीस पडत आहे. विधवाविवाहाचें अनुकरण लपून छपून चालतच आहे. बालविवाहाचें प्रकरण धुमसत आहेच. जातीभेदाचा विषय बाहेर तोंड काढून पहातच आहे. दुसरीकडे पाहिलें तर तुलाभार चालले आहेत, बाबुलनाथासारख्या देवळांस लाखों रुपये खर्च पडत आहेत, सोमयाग होत आहेत, शंकरास तुपाच्या पूजा बांधल्या जात आहेत, लक्ष्मीनारायण, मुरलीधर, दत्तात्रय या देवांच्या मूर्तीस फुलांच्या मुंडावळी चालू आहेत. अधिक महिना आला कीं, कोणी जिकडेतिकडे भागवताचे अष्टोदरशें सप्ताह बसवीत आहेत, कोणी नक्तभोजन करीत आहेत, कोणी धान्याच्या, फुलांच्या, बेलाच्या, तुळशीच्या लाखोल्या वहात आहेत. कोणी नानाप्रकारचीं दानें करीत आहेत, समुद्रावर स्नानासाठीं रोज गर्दी जमत आहे, शंकराच्या देवळांत महारुद्र व लघुरुद्रांचीं अनुष्ठानें बसलीं आहेत आणि गीतेचे व विष्णुसहस्रनामाचे पाठ चालले आहेत.

अशा प्रकारचे अनेक घोंटाळे पाहून त्यांतील खऱ्याखोट्याचा समज पडेना. कोणी सांगायला लागले कीं,

'तुका ह्मणे उगी रहावें। जें जें होईल तें तें पहावें ॥' या उक्तीचें अनुकरण करा ह्मणजे झालें.' असें सांगणाराम पुन्हां विचारिलें कीं, तें खरें पण प्रवृत्ती कोणत्या धर्माची ठेवावी,—ह्मणजे सांगतात कीं, "ईट, ड्रिंक अँन्ड बी मेरी" हीं प्रवृत्ती ठेवावी. असें कोणी कांहीं कोणी कांहीं सांगतात, पण कोणाचेंही सांगणें मनाला पटत नाहीं. कांहींच करूं नये तर हिंदुधर्माची उत्पत्ती झाली कशी, वेदशास्त्रें करणारांचा हेतु काय आणि कला उत्पन्न झाल्या कशा? पुराणें साधारण मनुष्यांनीं रचलेलीं नसून महान् विद्वानांनीं रचलीं असावीं असें त्यांच्या भाषारचनेवरून ह्मटलें पाहिजे, हें तर खरें ना? तर मग अतिशयोक्तीच्या व खोट्या गोष्टी रचण्यांत त्यांचा हेतु कोणता? ग्रंथ पहायला गेलें तर त्यांतील उपदेश, सिद्धांत व तत्वें अवर्णनीय, रचना फार गंभीर व मोहक असून बिनचूक. कौमुदीचीं सुत्रें पहा, त्यांत थोडक्यांत सिद्धांत कसे साधले आहेत बरें? हे तर प्राचीन ग्रंथ झाले. अर्वाचीन पहा कालिदासाचीं व शंकराचार्यांचीं काव्यें. आहेत का कांहीं चुका? कूट, अंतर्लापिका, बहिर्लापिका पहा, किती विद्वता होती पूर्वी? आहेत का तसे कोणी आतां सिद्धांती व कवी? संस्कृत राहूं द्या. हल्लींच दोन चारशें वर्षांत मोरोपंत, वामनपंडित, तुकाराम, रामदास, एकनाथ, नामदेव, मुक्तेश्वर, ज्ञानेश्वर, रामजोशी, इत्यादिकांचे प्राकृत ग्रंथ पहा. काय त्यांचे दाखले व किती श्रेयस्कर, ग्राह्य, निर्मल व निर्व्यंग उप-

देश ! आहे का कोणी आतां असा निर्ममत्वानें, निःपक्षपातानें व केवळ परोपकारबुद्धीनें उपदेशकर्ता व बोलण्या सारखें चालता ? ती वेळ कशी होती ह्मणाल तर मुसलमानी राजांचा सर्वत्र जुलूम पसरून धर्माचा लोप होत चालला होता आणि मराठे कोठें कोठें डोकीं वर करायला लागत होते. अशा वेळेस धर्माच्या प्रवृत्तीनें, धैर्यानें व अनेक दाखल्यांनीं देश व धर्मासाठीं मरण्यास मराठे लोकांत यांनींच शौर्य उत्पन्न केलें आणि भक्तीचे पंथ दाखविले ना ? हे पूज्य कां झाले होते ? धर्मास अनुसरणें, निःपक्षपातानें बोलणें व बोलण्याप्रमाणें चालणें याचमुळें ना ? यांपैकीं एकही गुण आतां कोणामध्यें आढळतो का ? इतके मोटमोठे अनेक विषयांवर ग्रंथ रचतांना मोरोपंत, वामनपंडित, रामदास व एकनाथ यांसारख्या ब्राह्मणजातीच्या विद्वान् व परोपकारी साधूंस मूर्तिपूजा, जातीभेद, विधवाविवाह, बालविवाह हे विषय सुचलेच नाहींत काहो ? किंवा त्या वेळेस मूर्तिपूजा नव्हती, कीं बालविवाह होत नव्हते, कीं बालविधवा होत नव्हत्या, कीं निरनिराळ्या जाती नव्हत्या अथवा होत्या ह्मटल्या तर त्यांत एकमेकांत रोटी व बेटी व्यवहार चालत होते ? त्यांच्या एवढ्या ग्रंथांत या विषयांवर दाखल्यास तरी एक शब्द आहे का ? त्यांनीं ईश्वराच्या एकत्वाविषयीं पुष्कळ लिहिलें, परंतु मूर्तिपूजा सोडली नव्हती आणि रामकृष्णादिकांना देवच मानीत होते. ते मूर्ख होते काहो ? असे मनांत विचार येऊन आमच्या धर्मांत

इतर सर्व धर्मांपेक्षां तथ्य विशेष असलें पाहिजे आणि आमचा धर्म सनातन निदान इतर धर्मांपेक्षां बराच पुरातन असावा अशी मनाची पक्की खात्री झाल्यावरून त्याविषयीं योग्य माहिती करून घेण्याची मला इच्छा उत्पन्न झाली.

आणखी असें एक मला आश्चर्य वाटतें कीं, इंग्रज लोक आमच्या देशांत येऊन आपला अम्मल बसविण्यासाठीं प्रथम कडकपणा वापरायला लागले तेव्हां त्यांस आह्मी राक्षस समजलों, पुढें कडकपणाचा बाणा कमी कमी करीत न्याय, दया व परोपकाराचें आंथरूण पसरायला लागले तेव्हां ते आह्मांस देवासारिखे दिसायला लागले आणि आतां जसजशी त्यांची विद्या व कला अवगत होत चाललीं तसतसे लागलों त्यांची आह्मी बरोबरी करायला, लागलों स्थानिक स्वराज्य मागायला आणि लागलों 'आमचा देश, आमचा देश' असें ह्मणून त्यांची कितीएक राज्यसूत्रें आमच्या हातांत द्या कारण आतां आह्मी हुषार झालों असें ह्मणायला. याच हेतूनें आपल्या देशाचा अभिमान धरा, एकीनें वागा आणि आपसांत दुही माजवूं नका असा लागलों सर्वांस उपदेश करायला, पण हे नुसते उपदेश हो. देशाभिमान व एकी यांचें बीज धर्माभिमानांत आहे, तो कोठें आमच्यांत भिनायला लागला आहे अजून ? आर्यधर्म चांगला, तो सोडूं नये—असें आह्मी व्याख्यानांत सांगतों. पण तें सांगण्याचा हेतु कोणता ह्मणाल तर ख्रिस्ती धर्मांत आमच्या लोकांनीं जाऊन बाटूं नये एवढाच. बाकी आमची

धर्माकडे प्रवृत्ति ह्मणाल तर त्याच्या नांवानें आंवळ्या एवढें पूज्य. अशानें कसा येणार हो आमच्यामध्यें देशाभिमान आणि होणार कशी एकी?

अ०—आजच्या संभाषणांत आपलें आरंभींचें बोलणें कांहीं विलक्षण धोरणावर निघालें आणि आतां तर आपण निराळेच विचार प्रदर्शित करायला लागलां, तेव्हां असा फरक पडण्याचें कारण काय आणि आपले खरे विचार कोणते समजावे?

मुं०—संभाषणाचा विषय काढून बोलण्यासाठीं कांहीं आपण येथें आलों नाहीं. हवा खाण्यासाठीं येऊन विसावा घेण्यासाठीव येथें बसलों आणि सहज वेळ जावा ह्मणून आपण बोलण्यास आरंभ केला. त्यांत ( मजकडे बोट दाखवून ) यांनीं अलिकडच्या विद्वानांवर ताशेरा झाडला आणि आपणही त्यांचेंच अनुकरण केलें तेव्हां मी त्याचा उलट पक्ष घेतला. तो सर्व विनोद झाला. पुढें बोलण्यांत आपले वकीली प्रश्न चालले तेव्हां मीं माझे खरे विचार बाहेर काढले.

अ०—प्रथमचा विनोद तर एकून? असो; पण कां हो, हल्लीं शिवाजी महाराजांच्या छत्रीच्या जीर्णोद्धारार्थ पैसा गोळा करण्याची किती खटपट चालली आहे पहा. त्यांच्या चरित्राचीं पुस्तकें निघत आहेत, चित्रें विकलीं जात आहेत आणि नाटकेंही होत आहेत. शृंगेरीच्या शंकराचार्यांच्या गादीला देखील मंडळीनें हालवून सोडिलें आणि दहा रुपयांचें वर्षासन करून घेतलें. रांडा, पोरें, आचारी, पाणके हे

देखील पैसे पाठवायला लागले. राष्ट्रीयसभा कौमार अव-स्थेंत येऊन पोंचली, सार्वजनिक सभा पोक्त दशेला आली, या सभा प्रजेचीं दुःखें थेट पार्लमेंटच्या कानापावेतों पोंचवायास लागल्या. याशिवाय प्रांतिक सभा तर अ-नेक वेळ भरतच आहेत. मोठमोठ्या शहरीं स्पेशल सभाही प्रसंगोपात भरण्यांत येतात. हे एकीचे व देशकल्याणाचे उपाय नव्हत काय? यांशिवाय दुसरे ते कोणते असतात? सामाजिक उन्नतीसाठीं सामाजिक परि-षद् निघालीच आहे, जिकडे तिकडे एकी करण्याविषयीं व्याख्यानरूपानें उपदेश चाललेच आहेत., या प्रकारें देशाच्या उत्कर्षाविषयीं बरेच यत्न चालल्यामुळें देशाभि-मानाचा शिरकाव व्हायला लागला, असें स्पष्ट दिसत असून आपण विपरीत कसें ह्मणतां?

मुं०—राष्ट्रीयसभा व सार्वजनिक सभा यांचा कटाक्ष निराळाच आहे. देशाभिमान, सामाजिक उन्नति व एकी या विषयांकडे त्यांचें वळण मुळींच नाहीं. रयत व सरकार यांच्यामधील संबंधाकडे त्यांचें लक्ष आहे. बाकीच्या सं-स्थांकडून जी चळवळ चालली आहे ती तुह्मांस बरी दिसते काय?

अ०—दिसते तर. अहो, मुळींच अभिमान नव्हता तो येत चालला तेव्हां बरा नाहीं का वाटायची?

मुं०—माझ्या प्रश्नाचा आशय आपल्या लक्षांत आला नाहींसें वाटतें. अहो, ही चळवळ मुयुक्तिक आहे का?

अ०—तें माझ्याच्यानें तूर्त सांगवत नाहीं, परंतु आज सुमारें तीन साडेतीन वर्षांवर एके दिवशीं पहांटेस कांहीं कामासंबंधानें मी गिरगांवांत जाण्यासाठीं निघालों. पोर्तुगीज चर्चच्या जवळ पोंचलों, इतक्यांत एक ओळखीचा गृहस्थ मला भेटला. त्याच्याशीं ट्राम्वे टर्मिनस ऑफिसाच्या बाहेर सडकेवरच उभा राहून मी बोलत होतों, तितक्या अवकाशांत शेजारच्या इराण्याच्या दुकानांतून दहा बारा मुलें, पंधरा पासून वीस पंचवीस वर्षांच्या वयाचीं, बाहेर पडतांना माझ्या दृष्टीस पडलीं. त्यांतलीं दोन तीन माझ्या परिचयाचीं होतीं. पुन्हां लागलींच दुसरीं मुलें एकामागून एक दुकानांत शिरतांना दिसलीं. त्यांतही एक दोघांस मी ओळखलें. ही ब्राह्मणांचीं मुलें देखील इराण्याच्या दुकानांत जायला लागलीं तेव्हां आतां जातींत ताळ तो कसला राहिला अशा प्रकारें सखेदाश्चर्य मनास वाटून, हें तंत्र कोठपर्यंत वाढलें तें पहावें या हेतूनें नंतर एक वर्ष पावेतों बारकाईनें शोध केला. आफिसा आफिसांनीं फिरलों; गिरण्या, गोद्या पाहिल्या; शाळा, कालेजें पालथीं घातलीं; क्रिकेटच्या खेळांतही जाऊन बसलों; हॉटेलें पाहिल्या; गल्लीकुचीला ह्मणजे आडरस्त्याला पारशी लोकांनीं घातलेलीं दारूचीं व खाण्यापिण्याचीं दुकानें पाहिलीं आणि नाटक, सरकस, याच कारणास्तव पाहिलीं. इतक्यांत कोणी एका ब्राह्मणानें पाव, बिस्कुट व निषिद्ध पदार्थ विकण्याचें दुकान काढल्याची बातमी मला मिळाली.

त्या दुकानावरून प्रथम मी दोनदां गेलों. त्या वेळेस त्या दुकानाचे मालक माझ्या दृष्टीस पडले. चहा, काफी, फराळाचें सामान व हिंदु पाव बिस्कुटें विकण्यासाठीं दुकानें काढणारे व खाणावळी घालणारे स्वयंपाकी व पाणके यांसारखे ते दिसले नाहींत. त्यांचा बाणा सभ्य दिसला. पुढें त्यांच्याविषयीं मी परभारें चौकशी केली. त्यांत ते सुखवस्तु असून पूर्वी मोठ्या कामावर होते, त्यांना असा हलकट धंदा करण्याची जरूर नव्हती, दुसरे चांगले धंदे ते करूं शकते अशी हकीकत मिळाल्यावरून मी एके दिवशीं मुद्दाम त्यांच्या दुकानीं गेलों आणि असा धर्मविरुद्ध धंदा काढण्याचें कारण त्यांस विचारण्याचें धारिष्ट केलें. असा माझा प्रश्न ऐकून ते मला शेजारच्या दुकानांत घेऊन गेले आणि तेथें त्यांनीं आपल्या खिशांतील नोटबूक काढून त्यांतलीं पांचपन्नास नांवें वाचून दाखवून ह्मणाले कीं,—“ अहो, हा धंदा मीं पोटासाठीं मुळींच काढलेला नाहीं आणखी मी स्वतः असल्या पदार्थांचा भोक्ताही नाहीं. हिंदुधर्माची व विशेषेंकरून ब्राह्मणधर्माची इमारत अगदीं ढासळली असें जिकडे तिकडे लोक बोलतात तें खरें कीं खोटें याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठीं निंदेची परवा न धरितां हा व्यवसाय मीं काढला. हा धंदा काढून मला आठ महिने झाले. आणखी तीन चार महिने असाच चालवून पुढें मी हा काढून टाकणार आहें. या व्यवसायांत मला तीन गोष्टींचा अनुभव आला. एक, बहुतेक ब्राह्मणांनीं व त्यांत इंग्रजी शिकणारांनीं तर

ताळच सोडला. खुशाल दारूची बाटली खिशांत घालून येतात आणि दारू पिऊन मांस यथेच्छ खातात. दुसरें असें कीं, हिंदुलोकांनीं कोणताही धंदा काढला तथापि त्याला हिंदुलोकांकडून उत्तेजन मिळेल ही तर त्यांनीं आशाच ठेवूं नये असें झालें आहे. कोणी कांहीं धंदा काढला कीं, प्रथम तो बरा असला तरी त्याची निंदा व काढणाराचे हातपाय गळतील असे त्यास उपदेश. बरें, इतक्यालाही न जुमानता त्यानें धंदा चालू ठेविला तर त्याच्याकडचा माल आपला देशबांधव समजून अभिमानानें घ्यायला जातील का? छे, जवळच्या युरोपियनच्या अथवा इराण्याच्या दुकानीं जाऊन व ज्यास्त किंमत पडली तरी देऊन तेथून घेतील. तिसरें असें कीं, धर्मविरुद्ध कांहीं जरी वर्तन केलें तथापि आतां कोणी विचारिता राहिला नाहीं. आपण अनोळखी असून प्रथमच्याच भेटीला असा प्रश्न केला तेव्हां मला हा सर्व पाढा वाचावा लागला."—याप्रमाणें सांगून आणि मला दुकानांत नेऊन कितीएकांच्या सहीच्या चिठ्ठ्या दाखविल्या. मी तें सगळें पाहून व त्यांची रजा घेऊन मुकाट्यानें निघून गेलों. मुंबई सोडून रेल्वेलाइनीनें बराच फिरलों आणि पुण्यास कांहीं दिवस राहून तेथें स्टेशनाजवळ हाटेल आहे तेथील चमत्कार पाहिला. या सर्व खटपटीनें मनाची खात्री झाली कीं, ख्रिस्ती, मुसलमान व पारशी यांनीं आणून दिलेलें पाणी व शिजविलेलें अन्न सेवन करण्याविषयीं शूद्रांपासून तों थेट ब्राह्मणांपावेतों

मनांत कांहीं एक शंका न आणणाऱ्या मंडळीची संख्या बरीच वाढत चालली आहे. पुढें असें वाटलें कीं, इंग्रजी राज्यामुळें हवें तें हवें त्याच्या हातचें खाण्याचा व सोंवळेंओंवळें व जातिभेद टाकून देण्याचा बराच पराक्रम आमच्या लोकांत आला. आतां वाटण्यांत ह्मणजे येशू ख्रिस्तास देव मानून व बायबल हेंच शास्त्र आहे असें समजून ख्रिस्ती ह्मणवून घेणें यापेक्षां कांहीं ज्यास्त राहिलें नाहीं. हिंदुधर्माचा पाया ढांसळत चालला आणि या धर्माचा त्राता कोणी राहिला नाहीं. ईश्वराच्याच मनांत असें आलें कीं काय ? या प्रकारचे कांहीं विचार माझ्या मनांत यायला लागले. इतक्यांत थोड्या दिवसांनीं या मुंबईशहरांत एकाएकीं मुसलमानांनीं मोठा दंगा केला. या दंग्याची हकीकत सर्वांस माहित आहेच. कायहो तो दंगा ! सांपडेलं त्या हिंदूला धर, ओढ आणि मार, असा एकसारखा सपाटा मुसलमानांनीं चालविला. तो दंगा मिटण्यासाठीं पोलिसांनीं आपलेकडून शिकस्त केली. पण थोडक्याच तासांत त्यांनाच तो अनावर होऊन पडला. त्यांना फौजेची मदत मागावी लागली. हिंदूंचें रक्षण त्यांच्यानें होईनासें झालें. अशी स्थिति कांहीं वेळपर्यंत पाहून मग बांधली हिंदूंनीं कंबर. त्यांनीं मुसलमानांची अगदीं दुर्दशा करून सोडली. असो; जें व्हायचें तें झालें, पण कां हो, त्या वेळची हिंदूंची एकी तुह्मांस आठवते काय ? मुंबईंत त्या समयास असलेला हिंदुमात्र एक. त्या वेळेस आपसां-

तलें वैर एकदम विसरून मुसलमानांपासून बचावण्यासाठीं एकमेकांस मदत करण्याला सर्व तत्पर झाले. हिंदूंमध्यें जाती पुष्कळ, पण त्या वेळेस जातींच्या अनेकत्वामुळें एकी होण्यास अनुरेणुइतकीही अडचण आली नाहीं. मुसलमानांत हिंदूंइतक्या नाहींत तरी बऱ्याच जाती आहेत. त्यांपैकीं तीन चार जाती तर दंग्यांत अगदीं सामील नव्हत्या. आमच्यांत तसा कांहीं प्रकार झाला नाहीं. झाडून सर्व जातींच्या लोकांचें मत एक झालें. काय हो, एकमत करा ह्मणून होते का त्या वेळेस कोणी लेक्चरें द्यायला, कोणी सभा भरायला अथवा मुसलमानलोकांस समजावयला? हे लेक्चरें देणारे तर त्या वेळीं दडायला लागले होते. त्यांना भीति पडली कीं, या वेळेस चौघांस जमवून चार शब्द बोलूं तर न जाणो फितुरी ह्मणून आपल्यालाच सरकार धरतील अथवा मुसलमान मारतील. कितीएक सुधारक तर इतके भिऊन गेले कीं, त्या भीतीनें त्यांनीं न्हाव्याला बोलावून आपल्या मस्तकावर फक्त शिखेपुरते केंश ठेवून बाकीचे भादरवून टाकिले, दाढ्या काढून टाकल्या, टोप्या ठेऊन देऊन रुमाल अथवा पागोटीं घालण्याचें आरंभिलें आणि गंध लावावयास लागले. असो; पण झालें काय तें कळलें का? मुंबईत व लागोपाठ इतर ठिकाणीं त्या वर्षांत असेच दंगे झाल्या कारणानें हिंदु निराळे, मुसलमान निराळे, पारशी निराळे व ख्रिश्चियन निराळे असें हिंदुमात्रास समजूं लागून, ते व आपण एक व्हावें जाती-

भेद बाळगूं नये ह्मणजे अनेक फायदे होतील असा त्यांच्या मनांतील ग्रह समूळ नाहींसा झाला. विशेषेंकरून मुसलमानांशीं बहुतेक प्रकारचा व्यवहार ते कमी करायला लागले आणि आपल्या हिंदुत्वाकडे लक्ष पोंचवून व हा आपला देश आहे असें मानून त्याचा अभिमान धरायला लागले आणखी आमचें नष्ट होत चाललेलें हिंदुत्व पुन्हां स्थापन करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची आठवण करायला लागले—हीं काय शुभ लक्षणें नव्हेत काय ?

मुं०—दंगे उपस्थित झाल्यापासून हिंदु निराळे व मुसलमान निराळे इतकें आमच्या लोकांना समजायला लागलें हें आपलें बोलणें वास्तविक आहे, तें मी कबूल करतों. पण याशिवायचे आपले सर्व उद्गार मला एकदेशी दिसतात.

अ०—ते कसे हो ?

मुं०—दंग्याविषयीं झाडून सर्व हिंदुमात्र एक झाला, असें आपण ह्मणालां. पण दंग्याचा आरंभ जर हिंदूंकडून झाला असता तर अशा एकीनें त्यांत सर्व हिंदु सामील झाले असते का ?

अ०—नाहीं.

मुं०—मुसलमानांनीं फक्त कामाठी लोकांशींच जर दंगा केला असता तर त्यांच्या बचावार्थ इतर जातींच्या सर्व लोकांनीं अशा एकमतानें मदत केली असती का ?

अ०—नाहीं.

मुं०—तर मग हिंदुमात्रावर मुसलमानांनीं कटाक्ष धरला ह्मणून सर्व हिंदु बचावासाठीं एक झाले खरे ना?

अ०—हो.

मुं०—बरें, शिवाजी महाराजांची छत्री बांधून किती वर्षें झालीं?

अ०—सुमारें दोनशें वर्षें.

मुं०—तेव्हांपासून आजपर्यंत त्या छत्रीकडे व त्या छत्रीच्या स्थलाकडे कोणाचें लक्ष गेलें नव्हतें काय?

अ०—मला खात्रीपूर्वक त्या गोष्टीविषयीं माहिती नाहीं; परंतु ऐकण्यांत असें आहे कीं, मराठी राज्य कायम होतें तेथपावेतों त्या छत्रीचें संगोपन चालू होतें. पुढें मराठीशाईचा ऱ्हास होऊन इंग्रजी राज्याचा झेंडा फडकूं लागला, तेव्हांपासून तिकडे सरकारच्या धाकानें ह्मणा किंवा इतर कारणानें ह्मणा कोणीही ढुंकून पाहिनासें झालें. त्यामुळें ती छत्री जीर्ण होत चालली. अलिकडे आठ कीं नऊ वर्षांवर अलिबागजिल्ह्याच्या कलेक्टर साहेबांस कांहीं कारणावरून ती जागा महत्वाची वाटल्यामुळें त्या ठिकाणीं जरा सफाई रहावी या हेतूनें सरकारास लिहून त्यांनीं त्यासंबंधीं दर वर्षास अमुक रक्कम खर्च करण्याची मंजुरी मागविली आणि तितक्या खर्चांत काम करण्याचें चालू केलें. तेव्हांपासून ज्याअर्थीं छत्रीच्या जागेचें महत्व इंग्रजांच्या लक्षांत आलें त्याअर्थीं छत्रीच्या जीर्णोद्धारार्थ हिंदूंच्या हातून कांहींतरी तजवीज झाली पाहिजे असा विचार आमच्यांपैकीं कितीएकांच्या

मनांत घोळूं लागला, पण हें खर्चाचें व खटपटीचें प्रकरण घेतो कोण हातांत ? लोक तरी पैसा देतील कीं नाहीं अशा विचारांत तें प्रकरण त्यांच्या मनांतच राहिलें. पुढें जेव्हां हिंदुमुसलमानांचे दंगे चालू झाले आणि त्यांमुळें हिंदुत्वाकडे लोकांचीं मनें वळायला लागलीं आणखी एकी व धर्म या विषयांवर व्याख्यानें व्हायला लागलीं तेव्हां अशा संधीस तें प्रकरण उपस्थित केलें तर आपला प्रयत्न सिद्धीस जाईल असें वाटल्यावरून त्यांनीं तो विषय बाहेर काढिला आणि शिवाजीसारखा पुरुष झाला ह्मणून मुसलमानलोकांनीं नष्ट करायला मांडलेल्या हिंदुत्वाचें रक्षण झालें असे व इतर पराक्रम त्या पुरुषाचे गाऊन व नाटकरूपानें करून दाखवून लोकांकडून छत्रीच्या जीर्णोद्धारार्थ पैसे काढायला लागले.

मुं०–तर मग या प्रयत्नांत देशाचा अभिमान जागृत व्हावा आणि एकी व्हावी हा हेतु तर नाहींच ना ?

अ०–मूळ हेतु तर तो नाहीं असें मला वाटतें आणि शिवाजी महाराजांचे पराक्रम गाण्यांत कांहीं तसा असला तर असेल. पण असला तरी तो दुय्यम हेतु. मूळ हेतु तर, मराठ्यांचे शत्रू असून त्यांच्या मनांत आलें आणि आह्मीं त्या राजानें रक्षण केलेल्या धर्माचे असून आह्मांला कांहीं सुचलें नाहीं हा कमीपणा काढून टाकावा, असा माझ्या लक्षांत येतो.

मुं०–अर्थात यावरून तुमचें बोलणें एकदेशी ठरलें तर ?

मुं०—तर मग हिंदुमात्रावर मुसलमानांनीं कटाक्ष धरला ह्मणून सर्व हिंदु बचावासाठीं एक झाले खरे ना?

अ०—हो.

मुं०—बरें, शिवाजी महाराजांची छत्री बांधून किती वर्षें झालीं?

अ०—सुमारें दोनशें वर्षें.

मुं०—तेव्हांपासून आजपर्यंत त्या छत्रीकडे व त्या छत्रीच्या स्थलाकडे कोणाचें लक्ष गेलें नव्हतें काय?

अ०—मला खात्रीपूर्वक त्या गोष्टीविषयीं माहिती नाहीं; परंतु ऐकण्यांत असें आहे कीं, मराठी राज्य कायम होतें तेथपावेतों त्या छत्रीचें संगोपन चालू होतें. पुढें मराठी-शाईचा ऱ्हास होऊन इंग्रजी राज्याचा झेंडा फडकूं लागला, तेव्हांपासून तिकडे सरकारच्या धाकानें ह्मणा किंवा इतर कारणानें ह्मणा कोणीही ढुंकून पाहिनासें झालें. त्यामुळें ती छत्री जीर्ण होत चालली. अलिकडे आठ कीं नऊ वर्षांवर अलिबागजिल्ह्याच्या कलेक्टर साहेबांस कांहीं कारणावरून ती जागा महत्वाची वाटल्यामुळें त्या ठिकाणीं जरा सफाई रहावी या हेतूनें सरकारास लिहून त्यांनीं त्यासंबंधीं दर वर्षास अमुक रक्कम खर्च करण्याची मंजुरी मागविली आणि तितक्या खर्चांत काम करण्याचें चालू केलें. तेव्हांपासून ज्या-अर्थीं छत्रीच्या जागेचें महत्व इंग्रजांच्या लक्षांत आलें त्या-अर्थीं छत्रीच्या जीर्णोद्धारार्थ हिंदूंच्या हातून कांहींतरी तज-वीज झाली पाहिजे असा विचार आमच्यांपैकीं कितीएकांच्या

मनांत घोळूं लागला, पण हें खर्चाचें व खटपटीचें प्रकरण घेतो कोण हातांत ? लोक तरी पैसा देतील कीं नाहीं अशा विचारांत तें प्रकरण त्यांच्या मनांतच राहिलें. पुढें जेव्हां हिंदुमुसलमानांचे दंगे चालू झाले आणि त्यांमुळें हिंदुत्वाकडे लोकांचीं मनें वळायला लागलीं आणखी एकी व धर्म या विषयांवर व्याख्यानें व्हायला लागलीं तेव्हां अशा संधीस तें प्रकरण उपस्थित केलें तर आपला प्रयत्न सिद्धीस जाईल असें वाटल्यावरून त्यांनीं तो विषय बाहेर काढिला आणि शिवाजीसारखा पुरुष झाला ह्मणून मुसलमानलोकांनीं नष्ट करायला मांडलेल्या हिंदुत्वाचें रक्षण झालें असे व इतर पराक्रम त्या पुरुषाचे गाऊन व नाटकरूपानें करून दाखवून लोकांकडून छत्रीच्या जीर्णोद्धारार्थ पैसे काढायला लागले.

मुं०–तर मग या प्रयत्नांत देशाचा अभिमान जागृत व्हावा आणि एकी व्हावी हा हेतु तर नाहींच ना ?

अ०–मूळ हेतु तर तो नाहीं असें मला वाटतें आणि शिवाजी महाराजांचे पराक्रम गाण्यांत कांहीं तसा असला तर असेल. पण असला तरी तो दुय्यम हेतु. मूळ हेतु तर, मराठ्यांचे शत्रू असून त्यांच्या मनांत आलें आणि आह्मीं त्या राजानें रक्षण केलेल्या धर्माचे असून आह्मांला कांहीं सुचलें नाहीं हा कमीपणा काढून टाकावा, असा माझ्या लक्षांत येतो.

मुं०–अर्थात यावरून तुमचें बोलणें एकदेशी ठरलें तर ?

अ०-एकदेशी ह्मणा कीं कांहीं ह्मणा. माझें ह्मणणें इतकेंच कीं, आपले लोक आपल्या देशाविषयीं अगदीं आंधळे झाले होते ते आतां जरा पहायला लागले आहेत ह्मणून मला कांहींसा आनंद वाटत आहे.

मुं०-बरं, आतां येथें गणपतींचे मेळे निघाले आहेत, याविषयीं आपला अभिप्राय काय आहे.

अ०-हें नवीनच आहे तेव्हां याविषयीं एव्हांच काय सांगणार ?

मुं०-पण याची उत्पत्ति कशी झाली तें आपण सांगूं शकतां काय ?

अ०-हो, मुसलमानलोकांच्या ताबुतांत कितीएक ब्राह्मणेतर हिंदु नाचण्यागाण्याच्या हौशीनें जात होते आणि त्यांना त्यांत कांहीं चिरीमिरी मिळत होती. पुढें झाले हिंदुमुसलमानांत दंगे. त्यामुळें हिंदूनीं मुसल्मानांत मिसळूं नये आणि अशा हौशी लोकांची हौसही पुरी व्हावी ह्मणून प्रथम पुण्यांतील लोकांनीं गतवर्षीं आळीआळींचे गणपती बसवून व त्यांत मेळ्यांची टूम काढून अशा लोकांचीं मनें रंजविण्याचें आरंभिलें, तोच कित्ता यंदां येथील लोकांनीं घेतला आहे.

मुं०-तुह्मी ह्मणतां त्याच हेतूनें मेळ्यांचा आरंभ झाला, यांत संशय नाहीं. परंतु मेळ्यांत सामील होऊन नाचण्यागाण्याची हौस ब्राह्मण लोकांना झाली हें काय ? ब्राह्मणलोक तर ताबुतांत नाचण्यास जात नव्हते.

अ०—माझ्या मनांतही तीच शंका उत्पन्न झाली होती; परंतु मतवर्षींचे मेळे पाहून गम्मत वाटली, दोन दिवस आनंदांत जातातसे दिसले, हे मेळे गणपतीनिमित्त निघाले आणि गणपती आपलेंही दैवत आहे तेव्हां आपणही मेळे काढावे असें वाटून येथें यंदां ब्राह्मणांनीं ते काढिले असावे असें मला वाटल्यावरून माझ्या मनांतील शंका दूर झाली.

मुं०—एवढ्याच साठीं का मेळे निघाले आहेत?

अ०—मला तर यापेक्षां कांहीं विशेष दिसत नाहीं.

मुं०—या मेळ्यांत कांहीं अलिकडची विद्वान् मंडळी आहे काय?

अ०—हो, हो, विद्वान् आहे, श्रीमंत आहे व पोक्तही आहे आणि त्यांतील बरेच मेळ्यांचा पुढारीपणा घेऊन बसले आहेत.

मुं०—सुधारलेले आहेत काय?

अ०—सुधारलले ह्मणजे?

मुं०—ज्यांनीं संध्या सोडली, देवपूजा सोडली, गंध लावायचें सोडलें, देवळांत जाऊन मूर्तीस नमन करण्याचें सोडलें, वैश्वदेव ब्रह्मयज्ञ सोडला, श्रावणी सोडली, सोंवळ्याओंवळ्याचा नाद सोडला, राम कृष्ण शंकरादिकांना देव मानण्याचें सोडलें, सर्व पोषाख इंग्रजांसारखे करायला लागले, जातीभेद सोडला, खाण्यापिण्याविषयींचा विधिनिषेध सोडला, व्याख्यानें देण्याचीं तीं इंग्रजींतच द्यावयास लागले, स्वभाषेंत व्याख्यान देणें हलकें समजावयाला लागले, व्या-

ख्यानांत आधार द्यायचे ते तरी इंग्रजांतील तत्ववेत्त्यांच्या वाक्यांचे- अशांना हल्लींचे ‘ कट्टे ’ सुधारक ह्मणतात आणि यांतले कांहीं व कुधारकांतलें कांहीं असें धरणारास ‘ अर्धवट ’ सुधारक अशी संज्ञा आहे.

अ०–तर मग अर्धवट सुधारकांपैकीं त्या मेळ्यांत बरेच आहेत खरे. कट्टया सुधारकांपैकीं कोणी मला अजून दिसलें नाहीं.

मुं०—आपण मेळे पाहिलेत वाटतें ?

अ०—हो, पाहिले आहेत आणि रोज एक दोन मेळे मी पाहतों.

मुं०–अहो, ही विद्वान्, श्रीमंत, पोक्त व अर्धवट सुधारक मंडळी या मेळ्यांत शिरली आहे ती गाण्यानाचण्यासाठींच का हो ?

अ०–एकी व देशाभिमान वाढण्याला हें मेळ्यांचें साधन बरें आहे असें वाटल्यावरून त्यांना उत्तेजन देऊन बळकटी आणण्याचा हेतूनें ती त्यांत शिरली आहे, असें मला दिसतें.

मुं०—यांत कांहीं गणपतीविषयीं भक्ति उत्पन्न झाल्याचा प्रकार दिसतो काय हो ?

अ०—छे, छे, तेवढें मात्र विचारूं नका. गणपतीचें उगीच आपलें निमित्त. कोणत्याही कृत्यास जमावानें आरंभ करावयाचा असला ह्मणजे कांहींतरी निमित्त लागतें ना ? त्यांतलेंच हें.

मुं०—अहो, मेळे गाणीं ह्मणतात त्यांत गणपतीच्या स्तवनाचीं गाणीं आहेत ना?

अ०—देशाभिमान, एकी व धर्मरक्षण या विषयावर बहुतेक गाणीं आहेत, त्यांत एखाद दुसरें गणपतीचेंही गाणें आहे. गणपतीच्याच उत्साहाचें निमित्त घेतलें तेव्हां नको का त्याचें गाणें? पण त्या गाण्यामुळें भक्तीचा वारा अगदीं प्रवेश करीत नाहीं.

मुं०—तर मग गणपतीचा उत्साह हें बाहेर दाखविण्याचें ढोंगच तर.

अ०—ढोंग नाहीं, ढोंगाचा बाप.

मुं०—तर मग ढोंगाच्या पायावर यांची भावी इमारत कशी उभारली जाईल हो?

अ०—त्याचा आतांच अंदाज करितां येत नाहीं. कारण, प्रकरण नवीन आहे. एव्हांच याविषयीं भवति न भवति करण्यांत काय फळ?

मुं०—आरंभींच पाया मजबूत केला ह्मणजे बरें नाहीं का? इमारत पडायला लागली ह्मणजे टेंके देणें यांत कोणतें शहाणपण?

अ०—‘सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृतः’ याप्रमाणें आरंभ थोडा दोषभरित असतोच, परंतु परिणाम चांगला झाला ह्मणजे तो दोष आपोआप नाहींसा होतो. तसा हा प्रकार. आपण इतकें खोदून विचारतां तेव्हां आपलें याविषयीं मत काय तें कळूं द्या पाहूं.

मुं०–सांगतों, सांगतों, उतावळे होऊं नका. मी विचारतों तें तर आधीं सांगा, नंतर मी आपणांस सर्व निवेदन करितों. ऐका, ही जी मेळयाबिळयांची गडबड चालली आहे यानें एकी होईल व देशाभिमान वाढेल असें तुह्मांस वाटतें काय ?

अ०–याविषयीं मी आपल्यास प्रथमच सांगितलें कीं, याबद्दल तूर्त मी कांहींच अनुमान करूं शकत नाहीं.

मुं०–निमित्त एका प्रकारचें, हेतु दुसऱ्या प्रकारचा व प्रवृत्ती तिसऱ्या प्रकारची असें असल्यावर, कोणतीही गोष्ट सिद्धीस जाते काय ?

अ०–प्रवृत्ती तिसऱ्या प्रकारची ह्मणजे ?

मुं०–निमित्त गणपतीच्या उत्साहाचें, हेतु एकी व देशाभिमान वाढविण्याचा—हे दोन मुद्दे तर तुमच्या लक्षांत आले ना ? आतां प्रवृत्ती निराळी कशी ती सांगतों. पण माझ्या थोड्याशा प्रश्नांचीं तर आपण प्रथम उत्तरें द्या, नंतर सर्व सांगेन.

अ०–चालूं द्या तर तुमचेच प्रश्न अगोदर.

मुं०–अहो, इंग्रज लोक आमच्यासारखे धोतरें नेसतात काय; आमच्यासारखे पाटावर बसून जेवतात काय; 'आमच्यासारखे मुकटे नेसतात काय; आमच्या बायकांसारखीं लुगडीं त्यांच्या बायका नेसतात काय; आमच्यासारखे नेमानें ते जेवणापूर्वी स्नान करितात काय; आमच्यासारखे गळयांत माळाबिळा घालतात काय; कपाळाला भस्म किंवा गंध

खावतात काय; आमच्यासारखे दागिने तरी ते वापरतात काय; आमच्यासारखीं संध्या, पूजा, व्रतें, उद्यापनें, प्राणायाम, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव, बलिदान, कुलधर्म-कुलाचार, श्राद्धपक्ष, होमहवन, नांदीश्राद्ध, स्वस्तिवाचन, व्रतबंध व लग्नविधि, ऋतुशांति, उदकशांति, ग्रहशांति किंवा जपतप ते करतात काय; आमच्यासारखी शेंडी ते ठेवितात काय; आमच्यासारखे अंगरखे, पागोटीं व जोडे ते घालतात काय; किंवा आमच्यासारखीं जानवीं ते घालितात काय?

अ०—नाहीं. यांपैकीं ते कांहींच करीत नाहींत.

मुं०—आमची भाषा ते आपल्या घरांत वापरतात काय?

अ०—नाहीं.

मुं०—आपल्या देशबांधवाशीं बोलतांना अथवा लिहितांना तरी?

अ०—नाहीं.

मुं०—व्याख्यान वगैरे देतांना?

अ०—क्वचित् क्वचित् वापरतात-नाहींच ह्मटल्यास चालेल-किंवा जेथें ती भाषा बोलण्या व लिहिण्याशिवाय अगदींच अडलें असें त्यांना वाटतें तेथें तिचा उपयोग करितात असें ह्मटल्यास हरकत नाहीं.

मुं०—आणि आह्मी हो?

अ०—आह्मी त्यांच्या उलट.

मुं०—त्यांच्यांत कथाकीर्तनें होतात का ?

अ०—नाहीं.

मुं०—कांहीं पारायणें ?

अ०—छे. त्यांच्यांत पारायण करण्याजोगें आहे काय ?

मुं०—ते कधीं आपल्या कार्यांत चौघडा व वाजंत्रीं बोलावितात काय ?

अ०—नाहीं. ब्यांडाशिवाय इतर वाद्यांचा ते कधींहीं उपयोग करीत नाहींत.

मुं०—आणि आह्मी हो ?

अ०—आह्मां काय विचारता ? आह्मांला ब्यांड पाहिजे आणि मुसलमानलोकांचे ताशे व ढोलही पाहिजेत. ब्यांडाशिवाय तर आमच्या कार्याला शोभा येत नाहीं, असा आमच्या मनाचा ग्रह होत चालला आहे. चौघडा नसला तर चालेल पण ब्यांड अवश्य पाहिजे, असें आह्मांला वाटावयाला लागलें आहे.

मुं०—हं, हं! ते कधीं आपल्यासारखे कलावंतिणींचे नाच व बैठकी करवितात काय ?

अ०—नाहीं.

मुं०—ते आपल्या देशांत तयार होणाऱ्या वस्तू वापरतात काय ?

अ०—कांहीं कांहीं वापरतात.

मुं०—कांहीं कांहीं ह्मणजे ?

अ०–ह्मणजे अन्न, पाणी, फळें, टेबलें, खुर्च्या, गाड्या, घोडे व कांहीं भांडीं वापरतात. ह्मणजे ज्या जिनसा विलायतेंत होत नाहींत किंवा होत असतील तरी त्या येथें थोड्या खर्चांत येऊं शकत नाहींत आणि ज्यांची अवश्यकता पडते तशा या देशांतील जिनसा ते वापरतात. येथलें कापड फारकरून वापरीत नाहींत. विलायतचेंच वापरतात.

मुं०–कांहो येथें आतां कापड होत नाहीं काय ?

अ०–होतें. आतां पुष्कळ प्रकारचें कापड व इतर जिनसा येथें व्हावयाला लागल्या आहेत आणि त्यांतल्या कांहीं कांहीं ते वापरतात, परंतु त्यांचा कल विलायती माल वापरण्याकडे सर्वोपरी असतो.

मुं०–त्याचें कारण काय असावें हो ?

अ०–विलायती माल वापरल्यानें स्वजातीय व्यापाऱ्यांस उत्तेजन मिळतें हें मुख्य कारण आणि कितीएक प्रकारचा माल विलायतसारखा येथें होत नाहीं हें दुसरें कारण.

मुं०–विलायती माल विकण्याचीं कितीएक दुकानें हिंदूंनीं, मुसलमानांनीं व साहेब लोकांनीं घातलेलीं आहेत आणि त्यांत साहेब लोकांनीं घातलेल्या दुकानांत मालाची किंमत ज्यास्त आहे आणखी हिंदुच्या व मुसलमानांच्या दुकानांत त्याच मालाची किंमत कमी आहे तथापि साहेबलोक स्वजातीयांच्या दुकानांतूनच तो खरीद कारितात आणि तेथें न मिळाल्यावर हिंदूंच्या अगर मुसलमानांच्या दुकानांतून घेतात, हें तुह्मांस माहीत आहे काय ?

अ०—होय. त्यांच्या अंगीं त्यांच्या देशाविषयींचा अभिमान व स्वधर्मबांधवांवर प्रीति पूर्णपणें वसत आहे.

मुं०—आणि आमच्या हो ?

अ०—त्यांच्या अगदीं विरुद्ध.

मुं०—देशाभिमानाविषयीं एवढी मोठी चळवळ चालली आहे ती काय उगीच का तर ?

अ०—कसली चळवळ ?

मुं०—वर्तमानपत्र व व्याख्यानद्वारें उपदेशांवर उपदेश चालले आहेत ते.

अ०—ते आपले उपदेशाच.

मुं०—उपदेशाच ह्मणजे ?

अ०—कांहींतरी बडबडायचें व खरडायचें पण आपण बोलतों अथवा लिहितों त्याप्रमाणें आपली प्रवृत्ती ठेवावयाची नाहीं हा त्याचा अर्थ.

मुं०—मग बोलण्याची व लिहिण्याची खटपट करितात तरी कशाला ?

अ०—हें एक प्रकारचें अलिकडच्या विद्येनें आमच्या लोकांस खूळच लागलेलें दिसतें.

मुं०—तें कसें काय ?

अ०—ऐका सांगतों. जरा उगीच दोन पैसे मिळावयाला लागून घरचा संसार चालायला लागला ह्मणजे बऱ्याच काळजींतून मुक्त झालेंसें वाटतें. पुढें उद्योगाचा व निद्रेचा वेळ वजा करून बाकीचा वेळ घालविण्यास कांहीं-

तरी साधन शोधून काढितात. कोणी खेळतात, कोणी गप्पा मारतात, कोणी फिरायला जातात, कोणी कांहीं पहावयाला जातात, कोणी वाचीत बसतात आणि कोणी व्याख्यानें ऐकायला जातात. त्यांत कितीएकांच्या मनांत एखादी टोळी जमवून व्याख्यानें देण्याचें चालविलें ह्मणजे आपणही लोकांत ओळखले जाऊं आणि जरा नांवालौकिकाला चढूं असें येतें. नंतर लागतात त्या उद्योगाला, देतात त्या टोळीला एखादें श्रीमंती नांव आणि मग एखादा सार्वजनिक विषय घेऊन लागतात त्यावर अद्वातद्वा बोलायला. अशा प्रकारें ही खटपट चालली आहे. आपण बोलतों काय व करितों काय याविषयीं मनाशीं विचारच करीत नाहींत. नुसत्या बोलण्यानें व लिहिण्यानेंच आपण आपल्या विद्येचा सदुपयोग केला असें समजून कृतार्थ मानितात. मागें पहा विष्णुशास्त्री पंडित होते तेव्हां विधवाविवाहासंबंधानें केवढें खूळ माजलें होतें तें. किती त्या विषयावर व्याख्यानें व भवति न भवति. त्या वेळच्या इंग्रजी शिकलेल्या बहुतेक मंडळींनीं तो विषय उचलला होता. परंतु त्या मंडळींपैकीं जेव्हां कितीएकांच्या आई, बहिणी व लेंकी गतभर्तृका झाल्या तेव्हां आतां हें विधवाविवाहाचें घोंगडें आपल्या घरांतच आलें असें वाटून हळुहळू बहुतेकांनीं पाय मागें घेतला. हाच प्रकार हल्लींच्या सर्व चळवळीचा.

मुं०—उपदेशापर्यंत तर मजल आलीना ?

अ०–हो, हो, नाहीं कोण ह्मणतो, पण अशा पोंकळ व्याख्यानांनीं व लांबलचक लेखांनीं आमचें नुकसान हो-ण्याचाच संभव दिसतो.

मुं०–अहो, मघाशीं ही चळवळ बरी दिसते असें आपण ह्मणालां ना आणि आतां असे कसे उद्गार काढतां?

अ०–अगदीं कांहीं नव्हतें त्यापेक्षां बरें, असें मी बोललों.

मुं०–पण आतां त्यापासून नुकसान होण्याचा संभव ह्मणतांना?

अ०–उपदेशाला मी दोष देत नाहीं, परंतु उपदेशाला अनुसरून उपदेशकांची प्रवृत्ती नाहीं यासाठीं हें नुकसान-कारक असें मी ह्मणतों; ह्मणजे उपदेशाच्या पोंकळपणावर माझा आरोप आहे.

मुं०–आपल्या बोलण्याचा आशय बरोबर माझ्या लक्षांत येत नाहीं. जरा खुलासा करून सांगाल तर बरें होईल.

अ०–सांगतों ऐका:—मस्तकावर शेंडी ठेऊन त्यावर पुणेंशाई पागोटें, कपाळाला भस्मलेप व त्यामध्यें ठळक गंध, कान टोंचून त्यांत भिगबाळी, दाढी काढून टाकलेली, गळ्यांत रुद्राक्षांची माळ, अंगांत प्योलेदार अंगरखा, व-रून नागपुरी उपरणें, कमरेला धोतर, पायांत पुणेंशाई जोडा असा पोषाख करून एखादा मुसलमान आपल्या म-शीदींत जाऊन निमाज पढावयास लागेल आणि कुराण सां-

गायला लागेल तर त्याच्या जातीचे लोक त्याला तेथें बसूं देऊन त्याच्या तोंडचे उपदेश ऐकतील काय?

मुं०—छे हो, नांव कशाला घेतां? असें सोंग पहातांच त्याला मारून एकदम मशीदीबाहेर काढतील आणि त्याच्याशीं व्यवहार बंद करतील. त्याचा उपदेश कोणी ऐकणार नाहीं.

अ०—तसेंच सोंग घेऊन एखादा युरोपियन आपल्या चर्चमध्यें जाऊन बायबल वाचायला बसेल तर त्याला दुसरे युरोपियन लोक बसूं देतील का?

मुं०—नाहीं. त्याचीही तीच दशा.

अ०—याचें कारण काय हो?

मुं०—त्यांना स्वतःच्या पोषाखाचा व रुढीचा अभिमान आहे ह्मणून.

अ०—आणि तुह्मांला हो?

मुं०—आह्मांला आमच्यांत पाहिजे तसा पोषाख व पाहिजे ती रुढी घातली तरी चालतें, कारण आमच्या लोकांना आपला देश, धर्म व रुढी यांचा अभिमान राहिला नाहीं—इतकेंच नाहीं तर—उलटा त्याची निंदा करण्याचा दुर्गुण प्राप्त झाला आहे.

अ०—हा दुर्गुण जोंपावेतों आहे तोंपावेतों यांचे कांहीं सामाजिक हेतू सिद्धीस जातील, 'असें तुह्मांला वाटतें काय?

मुं०—छे, छे, तशा कामासाठीं या दुर्गुणाचा तर प्रथम त्याग झाला पाहिजे आणि नंतर कांहीं तसें काम हातीं

घेतलें कीं गेलेंच सिद्धीस ह्मणा. अहो, असें सांगायला गेलें कीं मोठमोठे विद्वान् तोंड मुरडतात आणि तो विषय बंद करण्यासाठीं दुसराच विषय काढितात. त्यांना असें वाटतें कीं,-या विषयांत कांहीं आतां अर्थ नाहीं, कारण हा विषय आतां जगमान्य नाहीं, याचा विचार करण्याची वेळ राहिली नाहीं आणि कोणी काढला तर तो काढणारा निंदेस व उपहासास पात्र होण्याचा संभव आहे.-परंतु माझें मत त्याच्या उलट आहे. कसें तें सांगतों ऐका:-मुसलमानलोकांनीं आपल्या लोकांशीं दंगे करून विरोध मांडला तेव्हांपासून लौकिकरूपानें सर्व हिंदूंचें एकमत होऊन त्यांच्या मनांत मुसलमानांविषयीं वैषम्य उत्पन्न होऊं लागले ना? त्याच वेळेस जितके ह्मणून विद्वान्, श्रीमंत, व्यापारी व अविद्वान् हल्लीं देशाभिमान व एकीसाठीं झटत आहेत आणि जितके तशांच्या चळवळींत सामील झाले आहेत व होऊं पहाताहेत त्यांनीं-आज मुसलमान आपल्यावर उठले यावरून कधीं तरी पारशी व ख्रिश्चियनहीं उठतील-असें मनांत आणून, त्या सर्वांशीं अलग राहण्याचा निश्चय करून, त्यांच्या रुढी, त्यांचे पोषाख, त्यांचें खाणेंपिणें, परदेशी वस्तू अवश्यकतेवांचून वापरणें याचा त्याग सर्वस्वी एकदम करून व आपल्या सनातन रुढी, आपले पोषाख, आपल्या रिवाजाचें खाणेंपिणें व चालेपावेतों आपल्याच देशचा माल वापरून आपल्या देशबांधवांस उत्तेजन देणें याचें अनुकरण करून नंतर या मेळ्यांच्या

स्वरूपानें चळवळ बाहेर पाडली असती तर आज एकीला किती दृढता आली असती, परदेशांतील व्यापाराला एकदम धक्का पोंचून आपल्या देशाचा व्यापार किती वाढायला लागला असता, असा एकाएकीं फेरफार झालेला पाहून त्यांत सामील न झालेल्या देशबांधवांस किती चमत्कार वाटला असता, त्यामुळें पुस्तकांची व व्याख्यानांची कांहीं-एक खटपट न पडतां बोलविल्याशिवाय झुंडीच्या झुंडी यात्र मेळ्यांचें अनुकरण करण्यास लोटल्या असत्या, या पोंकळ चळवळीमुळें कित्येकांना निंदारूपानें तोंडसुख घे-ण्यास जागा मिळत आहे ती नाहींशी होऊन त्यांचीं तोंडें बंद झालीं असतीं, सरकारांस किती कौतुक वाटलें असतें आणि परदेशी व्यापाऱ्यांत किती गडबड उडून गेली असती हें पूर्णपणें आपण लक्षांत आणा, ह्मणजे सर्व तुम-च्या डोळ्यांपुढें उभें राहतें कीं नाहीं पहा. नुसत्या बड-बडीनें व पोंकळ दंभानें कांहींएक न होतां उलटें उपहा-सरूपी नुकसान होऊन विद्वत्तेस बट्टा लागतो आणि एकी न होतां घरांतच दुही माजते.

ज्या वेळेस (१) ज्यावांचून अगदीं अडतें अशाच या देशांतील वस्तू वगैरे वापरण्याचें पाश्चिमात्य लोकांनीं ब्रीद बाळगलें आहे तसें ह्मणजे मूर्खपणाची व नुकसानकारक आवड व हौस एकीकडे ठेऊन ज्या परदेशी जिनसां वगैरे शिवाय अगदीं अडत असेल तितक्याच कारणापुरत्या घेण्याचें आमचे लोक ब्रीद धारण करतील, (२) इतर ध-

र्मांची स्तुति किंवा निंदा न करितां आपला धर्म कोणता, त्याचीं तत्वें कोणतीं, कारणें कोणतीं, फल काय व सिद्धी काय याचें ज्ञान व अनुभव करून घेण्यासाठीं झटून तद- नुसार वर्तन ठेवतील, आणि (३) आपल्यांत सनातन चालत आलेल्या रुढीस चिकटून रहातील-त्या वेळेसच देशाच्या अभिमानाचा पाया घातला असें होईल, अंधपरंपरा नाहीं- शी होऊन खऱ्या हिंदुधर्माच्या ज्ञानाचा जिकडे तिकडे उजेड पडेल, हें खरें कीं तें खरें असा अज्ञानामुळें वारंवार होणारा मनांतील संकल्पविकल्प मोडेल, पाश्चिमात्य वि- द्येनें कांहींएक दुर्गुण आमच्या अंगीं प्राप्त झाले असल्यास ते समूळ नाहींसे होतील, आपल्या देशांत उद्योगधंदे वाढतील, आपला पैसा आपल्या देशांतच राहील, आप- ल्या अंगीं आपल्या देशबांधवांविषयीं प्रीति उत्पन्न होईल, देशाची उन्नती होईल, कीर्ति होईल व तो वंद्य होऊन रानटी असा ह्मणविला जाणार नाहीं, हे राज्यकर्ते आपली स्तुति करतील आणखी हल्लीं जसे आपल्यास तुच्छ मानतात तसें न मानतां उलटें सन्मान देऊन हरएक प्रकारें सहाय्य करतील. इंग्रजी राज्याचे सूत्रधार फार सूज्ञ, दूरदर्शी, परोपकारी, नीतीमान् व सत्यप्रीय आहेत आणि स्वधर्म व नीति यांला अनुसरून वागणारांस ते मान देत असतात, हें अनुभवसिद्ध आहे.

आमच्या देशांत आमच्या संसारास लागणाऱ्या वस्तू आतां बहुतेक तयार होतात. परदेशीं होणाऱ्या वस्तू न

घेतल्या तर आमचें अडून राहील असें क्वचित्. मात्र आपल्या देशांत तयार होणाऱ्या वस्तू, मग त्या सुबकपणामध्यें कांहीं अंशीं कमी असोत किंवा किंमतीमध्यें कांहींशा महाग असोत त्याकडे तूर्त लक्ष न देतां घ्यायच्या, तशा जातीच्या परदेशांतून आलेल्या जिनसा घ्यायच्या नाहींत, त्या घेण्यापेक्षां त्यांशिवाय चालवायचें अशी आमच्या लोकांची निश्चयात्मक प्रवृत्ती झाली पाहिजे आणि या प्रवृत्तीचीं उदाहरणें अलीकडच्या विद्वानांनीं स्वतः घालून दिलीं पाहिजेत. तसेंच आपल्या पूर्वापार चालत आलेल्या रुढी व आपल्या धर्माचे नियम कितीही अवघड अथवा अयोग्य वाटले तथापि '**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्। स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः॥**' या सदुपदेशानुरूप अनुकरण करून '**न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनां। जोषयेत्सर्व कर्माणि विद्वान्युक्तः समाचरन्॥**' या आज्ञेला अनुसरलें पाहिजे. असें झालें ह्मणजे सर्वच तात्काल जुळलें ह्मणून समजा. विद्येचें फल हेंच, विचाराचें कृत्य हेंच, देशाचें कल्याण यांतच, देशाच्या अभिमानाचें तत्व हेंच, संसारांत सुख व द्रव्याचा संचार यामुळेंच, अध्यात्मिक, अधिभौतिक व अधिदैविक लाभ यामुळेंच; एवंच सर्व सुखाचीं साधनें यांतच.

नाहींतर, आचारविचार व पोषाख परधर्मीयांसारखा ठेवायचा आणि व्याख्यान स्वदेशाभिमानावर लांबलचक व तें इंग्रजींत ह्मणजे परक्या भाषेंत द्यायचें; सुरापाननिषेध

व अहिंसा या विषयांवर पुस्तकें रचायचीं आणि व्या- ख्यानें द्यायचीं आणखी घरीं जाऊन अथवा घरीं न जम- ल्यास मुसलमानांनीं आपल्याशीं विरोध मांडला ह्मणून त्यांच्याकडे न जातां पारशी लोकांच्या अथवा ख्रिश्चियन लोकांच्या हाटेलांत जाऊन व्हिस्कीचीं ग्लासें उडवायचीं आणि करी-राईस, चाप्स, कटलेट, बॉइल्ड एग्स यांवर हात मारायचे हें काय देशाभिमान, एकी, सुरापाननि- षेध व अहिंसा यांचें अनुकरण कीं दूरीकरण हो? अ- शांची विद्या नाहीं का उलटी विघ्नें उत्पन्न करीत?

मारवाडी, कोळी, बाणकोटी हे यांच्यापेक्षां हजार वांट्यांनीं बरे. पहा एकाही मारवाड्यानें आपल्या पोषा- खाची घाटी, आपली संसाराची रुढी व आपला धर्म सोडला आहे का? त्यांच्या जातींत कसा एकोपा आहे तो लक्षांत आणा. आहे का कोणत्या कोर्टांत मारवा- ड्याची मारवाड्याबर फिर्याद? कोळीलोक पहा. त्यांच्यामध्यें मोठमोठे श्रीमंत आहेत, पण त्यांपैकीं कोणी अजून लंगोटी सोडली आहे का? तोच प्रकार कुळवाड्यां- मध्यें. एकूण घोटाळा सर्व ब्राह्मण, क्षत्रिय, परभू, सोनार, सुतार, कांसार, वाणी, भाट्ये या लोकांत व विशेषेंकरून त्यांतील इंग्रजी भाषा जाणणारांत ना! एक वर्ष किंवा दीड वर्षावर नवसरी व सुरत जिल्ह्यांतील कोळ्यांसारख्या जातीनें व बडोद्यांकडील हजामांनीं दारू पिण्याचें आपल्या जा- तींत बंदच करून टाकलें, हें तुमच्या ऐकण्यांत अथवा

वाचण्यांत आलें होतें का? आणखी आह्मी एवढें शिकून संवरून अशा खऱ्या बाबतींत प्रवृत्ती ठेवण्याच्या विषयास 'नान्सेन्स' समजायला लागलों ना? काय आमची अक्कल? अहाहा!!! ढोंगाची व गंमतीची चळवळ उपस्थित करण्यास आमचें पाऊल पुढें व तशा कामांत आह्मांला आमचे लोक एकत्र करून दाखवितां येतात आणि कांहीं धर्माची अथवा तद्धर्मानुसार रुढीची बाबत निघाली ह्मणजे डोकीं खाजवायला लागतात. हा धर्मलंडपणा नव्हे का? अशांची या जगांत जिनगानी व्यर्थ हो व्यर्थ! अहो, आतां जेथें व्याख्यान चाललें होतें त्याच ठिकाणीं–सुमारें चार पांच महिन्यांची गोष्ट आहे,–एकजण व्याख्यान देत होते. सभोंवतीं शेंपन्नास लोक जमले होते. मीही त्यांतच उभा होतों. व्याख्यानकार जरा पोक्त वयाचे ह्मणजे पन्नाशी उलटली असेल नसेल या बेताचे होते. त्यांचा अवतार भटजीबोवासारखा होता. व्याख्यान 'एकी' या विषयावर होते. पण त्या व्याख्यानांत त्यांचा इतका कांहीं रस पावळला कीं, न भूतो न भविष्यति. ते असें ह्मणाले कीं,– "आपल्यांत जातीभेदाच्या अनेकत्वामुळें आपल्या देशाची धूळधाणी होऊन गेली त्याकडे लक्ष द्या. हा हाटेलांत जाऊन जेवतो, हा इराण्याच्या दुकानांत चहा पितो, यानें एक अंगवस्त्र ठेविलें आहे, हा ओंवळ्यानें जेवतो अशा एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या मनांत आणूं नका आणि जनांत काढूं नका. अशा गोष्टींचा विधिनिषेध ध्यानांत

घेण्याची आतां वेळ राहिली नाहीं. अशा निंदेपासून आपापसांत वेबनाव होतात, यासाठीं त्याकडे आतां लक्ष न देतां ऐकीनें वागा. "-- हे शब्द ऐकून मला एकदम हसूं आलें आणि आश्चर्यही वाटलें. त्या दिवसापासून मीं या ठिकाणचीं व्याख्यानें ऐकण्याचें सोडलें.

अ०—तुह्मी या सर्व गोष्टी सांगितल्या त्या कोणाच्या मनांत येत नसतील काय ?

मुं०—कां येत नसतील हो? सगळ्यांच्या येतात. ते कांहीं अज्ञानी नाहींत; सर्व समजतात. मन तर ज्याचें त्याला खात असतें ना ?

अ०—तर घोडं अडतं कोठें ?

मुं०—बरं विचारलं. तेंही सांगतों ऐका:—एकतर,—आमच्या धर्मशास्त्राचे ग्रंथ संस्कृतभाषेंत असल्यामुळें त्याचा अर्थ बहुतेकांस समजत नाहीं. दुसरें—ज्यांना ती भाषा चांगली अवगत असून ज्यांनीं भाष्यें वगैरे पाहिलीं आहेत ते मंत्रांचे अर्थ सांगूं शकतात, परंतु मंत्र व तंत्र यांचा हेतु सांगूं शकत नाहींत. साहित्यांत गोमय, गोमूत्र, मृत्तिका, पय, दधि, दर्भ, भस्म इत्यादि वस्तू लागण्याचें कारण काय असें विचारलें ह्मणजे झाली त्यांची लटपट. त्यांतून तशा पक्षांचे कितिएक विद्वान् मूर्तिपूजा खोटी, व्रतें खोटीं अशा प्रकारचे उद्गार काढायला लागले आहेत. बरें, त्यांच्या प्रवृत्तीविषयीं शोध केला तर त्यांतही सुरापानी व परस्त्रीगामी आढळतात. तिसरें—मिशनरी लोक आमच्या

धर्माची व मूर्तिपूजेची निंदा करितात त्यामुळें सत्यासत्याचा निर्णय होत नाहीं. चवथें—इंग्रज लोकांत मूर्तिपूजा, संध्या, होमहवन, सोंवळेंओंवळें इत्यादिकांशिवाय चालतें आणि ते आमच्यापेक्षां ज्यास्त सुखांत आहेत असें आह्मांस प्रत्यक्ष दिसतें. आणखी पांचवें—आह्मी त्या लोकांसारखे वर्तायला लागलों तर आह्मांस कोणी तुच्छ मानतील अथवा जातीबाहेर टाकतील अशी भीति आमच्या मनांतून निघून गेली.—अशा कारणांमुळें आमच्या सनातन धर्माचें अनुकरण करण्यांत व सनातन रुढीला अनुसरण्यांत आमचें पाऊल मागें सरत चालले आणि परधर्मीयांच्या रिवाजांत कांहीं सव्यापसव्याचीं लचांडें नसल्यामुळें ते आवडायला लागले. अशाच कांहीं कारणानें परदेशी वस्तूंवर आमची भक्ती जडत गेली. हा असा प्रकार चालू होण्यास बरींच वर्षें लोटलीं, किंबहुना दोन पिढ्या होऊन गेल्या, यासाठीं त्याचा एकाएकीं त्याग होऊं शकत नाहीं. यावरून आलें का तुमच्या लक्षांत घोडें कोठें अडतें तें?

अ०—आलं, सर्व लक्षांत आलं. पण एकंदर सर्व गोष्टी ध्यानांत आणल्या ह्मणजे मोठें आश्चर्यच वाटतें. एकूण या देशाचें महत्व आमच्या मनांतून अगदींच नाहींसें झालें ना? अहो, या हिंदुस्थानदेशाला आर्य देश ह्मणतात. आर्य ह्मणजे श्रेष्ठ. या देशास श्रेष्ठत्व येण्याचीं कारणें अनेक आहेत. या देशांत पूर्वीं वेदप्रतिपादित वर्णाश्रमधर्म अ-

नादि व अति पवित्र असल्यामुळें त्याच धर्माप्रमाणें आचरणारे महान् महान् ऋषी, तपस्वी, ज्ञाते, योगी, आचार्य, साधुसंत, वीर, योद्धे व ईश्वराचे निःसीम भक्त होऊन गेले; नानाप्रकारच्या विद्या, कला इत्यादि अत्यंत अभ्युदयाप्रत पावलेलीं होतीं निःपक्षपात, न्याय व नीति साक्षात् नांदत होतीं; योगाभ्यास करतलामलाप्रमाणें होता; परकायाप्रवेशाची व संजीवनी विद्या जागृत होती; केवळ परोपकारार्थ स्मृती, मीमांसा, सांख्यशास्त्र, योगशास्त्र, उपनिषदें, भाष्यें इत्यादि अनेक सिद्धांती ग्रंथ ज्यांनीं रचून प्रवृत्तीचे व निवृत्तीचे मार्ग प्रतिपादन करून ठेवले असे सकल वेदवेत्ते व्यास, बृहस्पती, शुक्राचार्य, गौतम, कपिलमहामुनी, मनु, याज्ञवल्क्य, पराशर, पतंजली इत्यादि शास्ते, वक्ते व उपदेष्टे होऊन गेले; नल, हरिश्चंद्र, दुष्यंत, धर्म, पृथु व रामचंद्र यांसारखे प्राणांत संकटें प्राप्त झालीं तरी नीति व धैर्य यांस अणुरेणूइतकेंही न सोडण्याचा धडा घालून ठेवणारे पृथ्वीपती होऊन गेले; आपल्या चरित्रांनीं पतिव्रताधर्माचा कित्ता घालून ठेवणारीं तारा, मंदोदरी, अहल्या, सीता व द्रौपदी सारखीं रत्नें झालीं; युद्धास जातांना निरोप घेण्यासाठीं वीर आले ह्मणजे त्यांच्या अंगांत शौर्याचें स्फुरण आणण्याच्या हेतूनें पूर्वजांनीं केलेल्या पराक्रमाच्या गोष्टी सांगून, पराङ्मुख होण्यापेक्षां मृत्यु कीर्तिप्रद व श्रेयस्कर आहे असा उपदेश करून व वियोगदुःख लवमात्र मनांत न आणतां शुभ चिन्हांनीं आलंकृत करून

आनंदानें निरोप देणाऱ्या वीरमाता व वीरपत्न्या होऊन गेल्या; या प्रकारें कीर्तीप्रत पावलेला व सर्व प्रकारच्या वनस्पती, कंदमुलें, फळें, सर्व प्रकारचें अन्न, नवरत्नांच्या खाणी, उत्तम हवा व पाणी यांनीं भरलेला हा सुपीक व समृद्ध असल्यामुळें व इतर कोणताही प्रदेश असा सर्व प्रकारें परिप्लुत नसल्या कारणानें या देशास आर्यत्व प्राप्त होऊन वेदप्रतिपादित धर्मानें आचरण करणारास 'आर्य' अशी संज्ञा प्राप्त झाली. त्या आर्यांचे आपण वंशज असून व त्याच देशांत रहात असून आपला धर्म व देश यांच्या उत्कर्षाची आमच्या मनांत इच्छोच उत्पन्न होऊं नये काय आणि ज्या दिव्य पुरुषांनीं ही आर्यभूमी आपल्या गुणांनीं व पराक्रमांनीं आलंकृत केली त्यांची आठवणही होऊं नये काय? किती कृतघ्नता ही!! प्रातःस्मरणादि प्रकार सूज्ञांनीं उगीच का करून ठेविले आहेत? एवंच भगवद्गीतेंत सोळाव्या अध्यायामध्यें सांगितल्याप्रमाणें.—

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ।
न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते
॥ ७ ॥ असत्यमप्रतिष्ठंते जगदाहुरनीश्वरम् ।
अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥ ८ ॥
एतां दृष्टि मवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ।
प्रभवंत्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥ ९ ॥

काममाश्रित्य दुष्पूरं दंभमान मदान्विताः ।
मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान्प्रवर्ततेऽशुचिव्रताः॥१०॥
चिंतामपरिमेयां च प्रलयांतामुपाश्रिताः ।
कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः॥११॥
आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।
ईहंते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान्॥ १२॥
इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।
इदमस्तीदमपि मे भविष्यती पुनर्धनम् ॥१३॥
असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ॥
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी
॥ १४ ॥ आढ्योऽभिजन वानस्मि कोऽन्योस्ति
सदृशो मया । यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्य
ज्ञानविमोहिताः ॥ १५ ॥ अनेकचित्तविभ्रांता
मोहजालसमावृताः । प्रसक्ताः कामभोगेषु
पतंति नरकेऽशुचौ ॥ १७ ॥ आत्मसंभाविताः
स्तब्धा धनमानमदान्विताः । यजंते नामयज्ञै-
स्ते दंभेना विधिपूर्वकम् ॥ १७ ॥ अहंकारं
बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः । मामात्म-
परदेहेषु प्रद्विषंतोऽभ्यसूयकाः ॥ १८ ॥

अशी आमची असुरी स्थिति होऊन आम्ही केवळ शिश्नोदरपरायण व सर्वोपरी परावलंबी व्हावें काय? असा प्रकार अलीकडच्या व पलीकडच्या दोन्ही विद्वानांत चाल-लेला पाहून तर फारच आश्चर्य वाटतें. यांना गायत्रीमंत्र

नकोसा होण्याचें खरें कारण हे सांगू शकतील काय?
विवाहविधींतील:—

गृह्णामि ते सौभगत्वाय हस्तं मया पत्या जरदष्टिर्यथासः । भगो अर्यमा सविता पुरंधिर्मह्यं त्वा दुर्गार्हपत्याय देवाः ॥ भगस्ते हस्तमग्रहीत्सविता हस्तमग्रहीत् । पत्नी त्वमसि धर्मणाहं गृह पतिस्तव * * *

हे पाणिग्रहणाचे मंत्र व

ॐ अमोहमस्मि सा त्व ँ सा त्वमस्यमोहं । सामाहमस्मिऽऋक् त्वं द्यौरहं पृथिवीं त्वं । तावेव विवहावहै सहरेतो दधावहै । प्रजां प्रजनयावहै पुत्रान् विन्दावहै बहून् । ते सन्तु जरदष्टयः संप्रियौ रोचिष्णु सुमनस्य मानौ । पश्येम शरदः शतं जीवेम शरदः शत ँ शृणुयाम शरदः शतम् ॥

हा प्रतिज्ञामंत्र; गर्भाधानविधींतील:—

विष्णु र्योनिं कल्पयतु त्वष्टा रूपाणि पिंशतु ।
आ सिंचतु प्रजापति र्धाता गर्भं दधातु ते ॥
गर्भं धेहि सिनीवालि गर्भं धेहि सरस्वति ।
गर्भं ते अश्विनौ देवा वा धत्तां पुष्करस्रजा ॥

* * *

हे स्त्रीशीं विहार करण्यास प्रवृत्त होण्यापूर्वीचे मंत्र; पुढें पुंसवनसंस्कारांतील:—

ॐ पुमा ँ्सौ मित्रा वरुणौ पुमा ँ्सा व-
श्विना वुभौ। पुमा नाग्नि श्च वायुश्च पुमान् गर्भ
स्तवोदरे ॥ * * *

आणि नंतर दूर्वांचा रस नाकांत पिळते समयीं:—

ॐ आ ते गर्भो योनिमेतु पुमान् बाण इवेषु-
विम्। आ वीरो जायतां पुत्रस्ते दशमास्यः ॥

* * * * *

हे मंत्र; आणि असेच इतर संस्कारांतील केवल ईशप्रार्थना व शुभचिंतनरूपी मंत्र आहेत ते, त्यांचा अर्थ व हेतु समजत नाहीं, ते येत नाहींत, तसे मंत्र इतर धर्मांत नाहींत आणि विधींत थोडी उठबस करावी लागते इतक्याच कारणास्तव आह्मांस निरर्थक वाटायला लागून संस्कारच नकोसे व्हायला लागले—हा केवढा आमचा धर्मद्वेष? असो; कर्ममार्गाविषयीं आपला एक मवांचा लांबलचक प्रश्न आहे त्याच्या उत्तरांत सर्व खुलासेवार सांगेन.

पण हल्लीं मुसलमानलोकांच्या दंग्यापासून आमच्या मनांत देशाभिमान व एकी असण्याची इच्छा उत्पन्न होऊन ते दोन गुण प्राप्त करून घेण्याच्या हेतूनें गणतीच्या उत्साहांत मेळ्यांची टूम उपस्थित झाली आहे. यांत गणपतीवर श्रद्धा नाहीं एवढ्याचमुळें ती टूम दोपाला कारण आहे, असें माझें

ह्मणणें नाहीं. तरी त्यापूर्वी बनतील तितक्या स्वदेशी रूढी, आचार व पोषाख यांचा त्याग केला असें आपल्याच लोकांच्या एकाएकीं नजरेंत येण्याजोगी एखादा टूम मेळ्यांच्या उत्पादकांनीं काढली असती तर या मेळ्यांला बऱ्याच महत्वाचें स्वरूप प्राप्त झालें असतें, असें मला वाटतें. अजून वेळ आहे, कारण मेळ्यांची टूम अद्यापि सर्वत्र पसरली नाहीं. मागें अशीच जेव्हां आपल्या धर्माचा क्षय होण्याची वेळ आली होती तेव्हां धर्माकडे व देशाकडे लोकांचीं मनें वळविण्यासाठीं आमच्या साधुसंतांनीं खेळीया, गोंधळ, वासुदेव, पिंगळा, गारुडी, जोशी, भाट, बागूल, बहुरूपी व भांड अशा नकला काढल्या होत्या. असो, पण आतां तुह्मी बोलत येथें कोठपर्यंत बसणार ?

मुं०–( खिशांतील घड्याळ पाहून ) ओ हो, आठ वाजले. चला आतां. पण आमचे प्रश्न राहिलेच तर ?

अ०–हो हो, पण ते उद्यांवर ठेवाल तर बरें.

मुं०–उद्यांवर ठेऊं, चिंता नाहीं.


अ०–उद्यां येथेंच ना ?

मुं०–बरें विचारलें. नाहीं नाहीं. मघांशीं जें जोडपें आलें होतें त्यांच्या घरीं आपण बसूं. ते गृहस्थ कट्टे सुधारक आहेत. त्यांच्या लेडी साहेबही तशाच आहेत. त्यांचेही मुद्दे तुह्मांला ऐकवूं.

अ०–बरं चला तर आतां.

वाचकहो, याप्रमाणें संवाद झाल्यावर ते उभयतां चालते झाले. 'मी'ही त्यांच्या पाठोपाठ निघून गेलों.

## पहिला भाग समाप्त.



**सूचनाः**—हीं पुस्तकें मालकाकडे, ' मुंबईवैभव ' ऑफिसांत व बहुतेक नामांकित बुकसेलर्सच्या दुकानीं विकत मिळतील.

